मूल्य : रु. १० | वार्षिक वर्गणी रु. १२० | Visit : http://www.bsmdadar.com | RNI No. 1262096 | Title Code : MAHMAR45383 | Published on 10th January 2016

ॐ
॥ उद्धरेदात्मनात्मानम् ॥
ब्राह्मण सेवा मंडळ, दादर, मुंबई,४०००२८.
शतक महोत्सव २०१५-१६

ॐ
॥ उद्धरेदात्मनात्मानम् ॥
ब्राह्मण सेवा मंडळ प्रकाशित

# स्वयम्

ब्राह्मण सेवा

वर्ष दुसरे | अंक १४वा
जानेवारी २०१६



# गृहप्रकल्प पनवेल-मोर्बे येथे सुरु

**1BHK - 21 Lakh.**
(610 Sq.Ft.)
**1BHK - 18 Lakh.**
(517 Sq.Ft.)

किंमत सर्व करांसहित *
(स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन, सर्विस टॅक्स, व्हॅट, सोसायटी चार्जेस)*







## आपल्या हक्काचे घर घ्या अगदी कमी किंमतीत

वेगाने विकसित होणाऱ्या तिसरी मुंबई म्हणून उदयास आलेल्या व निसर्गाच्या सानिध्यात पनवेल परिसरात आधुनिक सोयी-सुविधायुक्त आपल्या बजेट मधील घरांची मालिका

## ठळक वैशिष्टये

- १७ बिल्डिंग व २७४ घरकुलांचा भव्य प्रकल्प
- सर्व नामांकित बँकांकडून ८० % पर्यंत लोन सुविधा उपलब्ध (SBI, DHFL, BOI & Other Banks)
- प्लान पास प्रकल्प, रायगड जिल्हा कलेक्टर यांची मंजुरी
- पावर बॅक अप सहीत लिफ्ट
- लॅण्डस्केप गार्डन, क्लब हाऊस, जॉगिंग ट्रॅक, चिल्ड्रन प्ले एरीया, मंदिर, कम्युनिटी एरीया, स्वीमिंग पुल, इंटरकॉम सुविधा.
- २४ तास सुरक्षा रक्षक, सी.सी.टी.व्ही. कॅमेरा
- शटल बस सेवा इत्यादी.

२० मि. पनवेल रेल्वे स्टेशन पासून ■ २० मि. पनवेल बस डेपो पासून
३० मि. पनवेल इन्टरनॅशनल एअरपोर्ट पासून
१५ मि. एम.आय.डी.सी.सी. तळोजा पासून ■ १५ मि. पेंधर मेट्रो स्टेशन पासून

साईट ऑफिस : एकदंत संकुल, सर्वे नं. २७/२, कोंडाळे गाव, ता. पनवेल, जि. रायगड.

**पनवेल संपर्क : 022 - 27467076 / 8898027676**

**संपर्क :**
**9699734545 / 9821243884 / 9821071540**

Eakadant Realtors, 7, Siddharudh Building, 75 Bhavani Shankar Road, Dadar (W), Mumbai - 400 028

# तर सांगायचं म्हणजे...

नमस्कार मंडळी,

२०१५ चे वर्ष सरता सरता साहित्यक्षेत्रात जवळ जवळ चार पिढ्यांच्या मनावर आपल्या वैविध्यपूर्ण कवितांनी अधिराज्य गाजवणारे श्रेष्ठ कवी, माननीय मंगेश पाडगांवकरांचे दुःखद निधन झाले. आयुष्यावर प्रेम करायला शिकवणारे थोर कवी आज आपल्यात नाहीत. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

मस्त थंडी पडली आहे ना! मागच्या महिन्यात जोडून चार दिवस सुट्ट्या मिळाल्याने गावाकडची थंडी अनुभवायला अनेकजण मुंबईबाहेर जाऊन आले असतील. या दिवसात 'झुंझुरमास' साजरा केला जातो. हा कालावधी मकरसंक्रांतीपर्यंत असतो. सूर्योदयापूर्वी उठून देवाची पूजा करतात. मुगाच्या डाळीची खिचडी, बाजरीची भाकरी आणि वांग्याची भाजी असा बेत केला जातो आणि सूर्योदयापूर्वी सगळे मिळून चक्क जेवतात. पुण्यात अजूनही ही प्रथा पाळली जाते. काही हॉटेलमध्ये हा खास मेनू पहाटेच उपलब्ध असतो म्हणे. तसेच आवळी भोजनाचेदेखील आयोजन होते. बघा ना, आपल्या पूर्वजांनी, मोसमाला अनुसरून वेगवेगळ्या समारंभांची कशी छान आखणी केली होती.

१० डिसेंबरला तारखेप्रमाणे शांतीपाठाने आणि तर तारखेप्रमाणे आणि तिथीप्रमाणे २६ डिसेंबरला उदकशांतीने मंडळाच्या शतक महोत्सवाची सुरुवात झाली आहे. २६ डिसेंबरला 'चक्रसंगीत' या कार्यक्रमात प्रत्येकाच्या आयुष्यात येणाऱ्या विविध चक्रांच्या आऱ्यांना अनुसरून एकमेकांत गुंफलेल्या गाण्यांचा बहारदार कार्यक्रम झाला. रसिक श्रोत्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने, कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. याच वेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळाही उत्साहात पार पडला.

या महिन्यापासून स्वयम्‌ची पृष्ठसंख्या वाढवत आहोत. जेणेकरून जास्तीत जास्त मान्यवरांचे विचार आणि मनोरंजक व उपयुक्त सदरे आपल्यापर्यंत पोहोचवू शकू. जवळ जवळ तीन हजार घरांमध्ये 'स्वयम्' पोहचत असल्याने उद्योजकांना जाहिरातींसाठी ही उत्तम संधी आहे. याचा जरूर विचार करावा. त्या संबंधी अधिक माहितीसाठी कार्यालयात संपर्क साधावा. मागील अंकात उल्लेख केल्याप्रमाणे फेब्रुवारी २०१६च्या 'स्वयम्'मधून प्रथितयश उद्योजकांचे विचार आपल्यापर्यंत पोहोचवणार आहोत. आपल्याला ते मार्गदर्शक ठरू शकतात. तरी ज्यांना लेख द्यायचे असतील त्यांनी २० जानेवारी पर्यंत मंडळाच्या कार्यालयात जरूर पाठवावेत. तसेच मार्च २०१६चा 'स्वयम्' 'अर्थकारण' या विषयावर आधारित असणार आहे. त्या संबंधी आपले लेख २० फेब्रुवारीपर्यंत आमच्यापर्यंत पोहोचवावेत, ही विनंती.

शतक महोत्सवाच्या निमित्ताने व सालाबादप्रमाणे होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती सुद्धा या अंकात देत आहोत. यंदा माघी चतुर्थीला दि. ११ फेब्रुवारी रोजी श्रीगणेशयागाचे आयोजन केले आहे. त्या दिवशी सकाळी ८ ते संध्याकाळी ५ दरम्यान गटागटाने श्री अथर्वशीर्षाची आवर्तने आयोजित केली आहेत. अखंड आवर्तनांचा संकल्प केला आहे. इच्छुकांनी मंडळाच्या कार्यालयात आपली सोयीची वेळ दि. ८ फेब्रुवारीपर्यंत नोंदवावी म्हणजे व्यवस्था करणे सोपे जाईल.

चला तर मग मंडळी, कार्यक्रमांच्या निमित्ताने वरचेवर भेटूच.

२०१६ या इंग्रजी नववर्षाच्या सर्वांना शुभेच्छा!

धन्यवाद.

सौ. कल्पना साठे




■ कार्यकारी संपादक
**सौ. कल्पना वसंत साठे**

■ स्वयम् संपादकीय मंडळ
**श्री. विनायक कृष्णाजी लेले**
**श्री. संतोष बाळकृष्ण वैद्य**
**श्री. अभय अनंत सावरकर**
**सौ. अधिता अर्चिस लेले**
**सौ. नीला विद्याधर वैशंपायन**

■ संपादन सहाय्य
**श्री. मनोज आचार्य**

■ मुखपृष्ठ
**श्री. मनोज आचार्य**

■ अक्षरजुळणी व मांडणी
**अद्वैत प्रिंटर्स**

■ छायाचित्रे
**कौस्तुभ महाजन**

■ संपादकीय विभाग पत्रव्यवहार
**स्वयम, ब्राह्मण सेवा मंडळ**
भवानी शंकर रोड, दादर (प.)
मुंबई-४०००२८
दूरध्वनी : २४२२९११८
२४३७१९४९

कार्यालयीन वेळा (रविवार बंद)
सकाळी ८.३० ते १२.३०
सायंकाळी ४.३० ते ८.३०

ई-मेल : svayambsm@gmail.com
वेबसाईट : www.bsmdadar.com


# मागे परतोनी पाहे

## संकलन : विनायक लेले

ब्राह्मण सेवा मंडळ, विश्वस्त
vinayklele1812@gmail.com



१९४१च्या अखेरीस मंडळाचा रौप्य महोत्सव साजरा झाला तोच मुळी भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या अंतिम पर्वाच्या सुरुवातीला. त्यातच १९४२ साली दुसऱ्या महायुद्धाची भर पडली. १९४२ ते १९४६ या कालावधीत मंडळामध्ये हळदीकुंकू समारंभ, श्रावण्या, गणेशोत्सव, महालक्ष्मी, दसरा संमेलन, गीताजयंती आणि संक्रांत संमेलन असे पारंपरिक धार्मिक कार्यक्रम, गीता पठण वर्ग, शिवणाचे वर्ग, संस्कृतचे वर्ग, ग्रंथालय शुश्रूषेची उपकरणे उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, मान्यवरांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सत्काराचे, पानसुपारीचे कार्यक्रम आणि वेळोवेळची परिस्थिती बघून व्याख्याने, प्रवचने आणि कीर्तनाचे आयोजन करण्यात येत होते.



**१९६६ मध्ये मंडळाचा सुवर्णमहोत्सव – मंडळाच्या इमारतीच्या वाढीव बांधकामास सुरुवात**

१९४७ साली मंडळात ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाने स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. १९४८ साली महात्मा गांधींच्या हत्येनंतर उसळलेल्या दंगलीत, मंडळाचे कार्यालय आणि ग्रंथसंग्रहालयाचे तसेच इतर मालमत्तेचेही बरेच नुकसान झाले. दादरमधील मंडळ, ब्राह्मण सहायक संघ, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ आणि शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण मंडळ या चार ज्ञातीय संस्थांच्या वतीने मंडळाच्या वास्तूत शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. दंगलीत झालेल्या नुकसान भरपाईसाठी सरकार दरबारी अर्ज करून रु. ३३००/- मिळाल्याची नोंदही आपल्याला १९४८-४९च्या अहवालात सापडते.

१९४८ सालच्या स्वातंत्र्यदिनाला दादरमधील ६६ सामाजिक आणि ज्ञातीय संस्थांचा एकत्रित कार्यक्रम मंडळाच्या पुढाकाराने संपन्न झाला होता. त्याच वर्षी डिसेंबर महिन्यात 'स्नेहसंमेलन' आयोजित करण्यास सुरुवात झाली. व्याख्याने, प्रवचने आणि करमणुकीचे कार्यक्रम याचबरोबरच स्नेहभोजन आणि चर्चासत्र असे या संमेलनाचे स्वरूप असे. दोन-तीन दिवस चालणारे संमेलन दादरकरांसाठी एक पर्वणी ठरत असे. दर महिन्यास एक कार्यक्रम आयोजित करून, सभासद आणि ज्ञातीय बंधूभगिनींशी सतत संपर्क राहावा असे ठरवून त्यानुसार अंमलबजावणीही सुरू झाली.

२ ऑक्टोबर १९४९ रोजी स्त्री शाखेची स्थापना झाली. स्वतंत्र कार्यकारी मंडळ, स्वतंत्र अंदाजपत्रक आणि मंडळाच्या तत्कालीन घटनेच्या चौकटीत स्वतंत्र नियमावली बनविण्यात आली. आर्थिक स्वयंपूर्णता येण्यासाठी २४ डिसेंबर १९४९ रोजी, स्त्री शाखेने 'आशीर्वाद' या नाटकाचा प्रयोग लावला होता आणि त्याला ४०० महिला उपस्थित होत्या.

त्याच वर्षी राष्ट्रभाषा विद्यापीठ, वर्धा यांच्या तर्फे घेण्यात येणाऱ्या हिंदीच्या परीक्षांसाठी तर नव्याने आलेल्या हिंदू कोड बिलाची माहिती व्हावी, यासाठी वर्ग सुरू करण्यात आले. शिवाय निधी संकलनासाठी राष्ट्रीय कीर्तनकार गोविंद स्वामी आफळे यांच्या कीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

१९५० साली मंडळाच्या संस्कृतवर्गातील विद्यार्थ्यांना टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षांना पाठविण्यास प्रारंभ झाला. पहिल्या वर्षी ७०% परीक्षार्थी उज्ज्वल यश प्राप्त करून उत्तीर्ण झाले, अशी नोंद आपल्याला अहवालात आढळते.

गणेशोत्सवाचे ते रौप्य महोत्सवी वर्ष होते. स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्नाने वर्गणी गोळा करून गणेशोत्सव दणक्यात साजरा केला होता. शिवाय वीसच्या वर कार्यक्रम आणि पंधराच्या वर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विसर्जनाच्या मिरवणुकीत पुढे भगवा ध्वज आणि त्याच्यामागे शिस्तबद्ध स्वयंसेवक अशी दादरकरांच्या डोळ्याचे पारणे फेडणारी मिरवणूक आयोजित केली होती.

१९५२-५३ च्या अहवालात दादरमधील ज्ञातीय उद्योजकांच्या जाहिराती छापून त्यांच्या व्यवसायाच्या प्रसिद्धीस मदत करण्यात आली.

१९५३ साली फक्त महालक्ष्मीपूजनाच्या कार्यक्रमाऐवजी त्या वर्षीपासून ५ दिवसाच्या 'शारदोत्सवाला' सुरुवात झाली.

याच वर्षी सौ. सिंधूताई वेलणकर ह्या कार्यकारी मंडळात पहिल्या स्त्रीसदस्या म्हणून निवडून आल्या.

१९६० पासून मंडळाची तत्कालीन इमारत पाडून नवीन इमारत बांधण्यासाठी विचार सुरू झाला. त्यासाठी विशेष सर्वसाधारण सभांचे आयोजन करून, एक स्वतंत्र उपसमिती नेमण्यात आली. १९६१ साली बांधकामास सुरुवात होऊन १९६२ साली तळमजला व पहिला मजला असे बांधकाम पूर्ण झाले. श्री. सी. गो. बहुतुले यांनी या कामी महत्त्वपूर्ण देणगी दिली. तर खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी रु. २१५००/- कर्जाऊ घेण्यात आले. १९६४-६५ पर्यंत ह्या रकमेची परतफेड करून, पुढील मजल्यांच्या बांधकामासाठी हालचाल सुरू झाली.

१९६१ साली बालशाखा आणि क्रीडाशाखा सुरू करण्यात आली. टेबलटेनिस, बुद्धिबळ आणि कॅरम खेळण्याची सोय मंडळात उपलब्ध होती. क्रीडा शाखेच्या क्रिकेटच्या संघाने १९६२ साली टाईम्स शिल्ड व अन्य स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता.

१९६३ साली 'सामुदायिक व्रतबंध' सुरू झाले. पहिल्या वर्षी ९ बटूंचे व्रतबंध संपन्न झाले. त्या निमित्ताने मंडळाच्या उपक्रमांत आणखी एका उपक्रमाची भर पडली.

१९६६ साली मंडळाचा सुवर्ण महोत्सवी वर्षात मंडळाच्या इमारतीच्या वाढीव बांधकामास सुरुवात करायची असल्याने, छोटेखानी समारंभ २९ व ३० ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यात सत्यनारायणाची पूजा, ग्रहशांती होम, वैदिकांचा परामर्श आणि शास्त्रीय गायनाचा तसेच करमणुकीचा कार्यक्रम इत्यादी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

नवीन वास्तूचे (विद्यमान इमारत) बांधकाम जोरात सुरू झाले. १९६२ साली बांधलेल्या इमारतीशी संलग्न असे नव्या इमारतीचे स्वरूप ठेवण्यात आले होते.

नव्या वास्तूत प्रवेश करत मंडळाने कामाचा आवाका वाढविण्याच्या दृष्टीने झेप घेतली.

(क्रमशः)

■

## वर्धापनदिन सोहळा - क्षणचित्रे



# पुढचं पाऊल!

**सुधीर जोगळेकर**

**ज्येष्ठ पत्रकार**
sumajo51@gmail.com

ब्राह्मण सेवा मंडळाच्या अंकासाठी लेख लिहाल का, असं विचारणारा संतोष वैद्य यांचा दूरध्वनी यापूर्वी दोन-तीनदा येऊन गेला होता, परंतु 'आता लिहा' असं आज्ञार्थी सुचवण्याची मेख त्यांच्यात नसल्यामुळे ते फारसं मनावर घेतलं नव्हतं. परंतु परवा तो आज्ञावाचक दूरध्वनी आला आणि धडकीच भरली. नेमकं काय लिहावं, खरं लिहावं की बरं लिहावं असा प्रश्न मनासमोर उभा राहिला. जे खरं लिहू ते बरं असेलच असं नाही आणि जे बरं लिहू ते खरं असेलच असं नाही, अशी ठाम खात्री मनात असल्यामुळे तर प्रश्नाचं गांभीर्य आणखीनच वाढलं. त्यातही नेमका विषय सुचवला असता, तर त्या विषयाच्या अनुषंगानं,



थोडंफार इकडचं तिकडचं पाणी घालून वेळ साजरी करता आली असती. परंतु सगळं तुम्हीच ठरवा असा सूर वैद्यांनी लावला आणि परिस्थिती आणखीनच अवघड झाली.

सालाची अखेर तमाम ब्राह्मण बांधवांची कॉलर ताठ करणारी घडली. स्वबळावर भारतीय जनता पार्टीचे सरकार महाराष्ट्रात आलं आणि देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. ब्राह्मण व्यक्ती महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान व्हावी, हा स्वातंत्र्योत्तर बनलेल्या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातला दुसराच योग. देशाचंच नव्हे, तर महाराष्ट्राचंही राजकारण जातीविद्वेषानं पोखरलं गेलेलं असताना आणि उच्चवर्णीयांना राजकारणातूनच काय समाजकारणातूनही बहिष्कृत करण्याची भाषा बोलली जात असताना, त्यासाठी लढे-चळवळी उभारल्या जात असताना, शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात ब्राह्मण समाजातील एका तरुण, तडफदार, अभ्यासू, उच्चशिक्षित आणि त्याचबरोबर स्वच्छ, पारदर्शी व्यक्तिमत्त्वाच्या देवेंद्र फडणवीसांना मुख्यमंत्रीपद देऊ करून भाजपा श्रेष्ठींनी एक अनोखी पहल केली याचं स्वागतच केलं पाहिजे. परंतु त्याहीपेक्षा फडणवीसांनी पक्षोपक्षात आसनस्थ झालेल्या जातीय मुखंडांना आपल्या संघटनकौशल्यात गुंफून महाराष्ट्राचं राजकीय समरसतेचं संचित वृद्धिंगत केलं याला दाद दिलीच पाहिजे.

ब्राह्मण सेवा मंडळालाही या गोष्टीचा आनंद झालाच असणार. मंडळ हे ब्राह्मणांमधल्या विशिष्ट पोटशाखेची संघटना नाही हे खरं असलं, तिनं ब्राह्मणांच्या सर्व तीस-बत्तीस पोटशाखांना सामावून घेतलेलं असलं, तरी तिचंही काम एका चौकटीबाहेर जाऊ शकलेलं नाही, हे नाकारता येणारं नाही. सगळ्याच ब्राह्मण संघटना ज्या एका चौकटीत अडकल्या आहेत, त्याच त्या चौकटीत दुर्दैवानं वा योगायोगानं मंडळही अडकलं आहे, हे वास्तव नाकारता येणारं नाही. अर्थातच ही चौकट शैक्षणिक शिष्यवृत्त्यांची आहे; वधू-वर सूचक मंडळाची आहे; सांस्कृतिक कार्यक्रमांची आहे; ब्राह्मण समाजातील मान्यवरांच्या सत्कारांची आहे; ज्ञानसंवर्धनपर उपक्रमांची आहे; फार फार तर पतसंस्था वा पतपेढीसारख्या आर्थिक पावलांची आहे; परंतु त्यापलीकडे जाऊन काही संपूर्ण नवं, क्रांतिकारक करावं असं फारसं विचारात आल्याचं दिसत नाही.

आपण महाराष्ट्रापुरता विचार करतो आहोत, आपलं विचारविश्वही मराठीपुरतं मर्यादित आहे आणि ज्या संस्थेचे आपण सर्व सदस्य आहोत तिचं कार्यविश्वही मुंबईपुरतंच मर्यादित आहे. परंतु असं असलं तरीही मुंबईला जो कॉस्मॉपॉलिटन चेहरा प्राप्त झाला आहे, तो लक्षात घेता मंडळानंही आता बहुभाषिक ब्राह्मणांमध्ये संघटन विस्तारलं पाहिजे. कार्यक्षेत्र दुसऱ्या वा नव्या नव्हे, तर तिसऱ्या आणि भावी महामुंबईला वेढणारं बनवलं पाहिजे. स्वातंत्र्योत्तर वर्षात आरक्षण नीतीचा जो फटका उच्चवर्णीयांना बसला, त्यात समस्त ब्राह्मण समाज पार भरडून निघाला. सरकारी नोकऱ्या तर संपल्याच, परंतु तरुण उच्चशिक्षित पिढी परप्रांतात वा परदेशात जाऊ लागल्यानं समाजाचं नेतृत्व करू शकणारी, उद्योग-व्यवसाय-शेतीसारख्या आरक्षणनीती न लागलेल्या क्षेत्रांचं नेतृत्व करण्याची क्षमता असणारी पिढीही दुर्मीळ होऊ लागली.

आर्थिक उदारीकरणानं तरुण पिढीच्या हाती पैसा खेळू लागला हे खरं असलं वा त्यामुळेच त्याला त्याच्या ब्राह्मण समाजाचं हे वास्तव बोचेनासं झालं असलं, तरी आलेला सगळाच पैसा स्वत:वर वा कुटुंबावर उधळून टाकण्याऐवजी तो जमिनीत, शेतीत गुंतवावा, आयकर वाचवण्यासाठी का होईना

तो चांगल्या समाजकार्यावर खर्च करावा, थोडी रिस्क असली तरी तो नव्या व्यवसायात गुंतवावा असा विचार तो करू लागला आहे. उद्योग-व्यवसायातली नवी पिढी ब्राह्मण समाजातून उभी राहते आहे. मंडळासारख्या संस्थांनी याचं भान ठेवून नव्या उपक्रमांची आखणी केली पाहिजे.

एका वास्तवाचं भान मात्र ब्राह्मण समाज विसरला आहे. विसाव्या शतकातला बहुतांश काळ शेतीक्षेत्राचं नेतृत्व ब्राह्मणांकडे होतं. शेतीशी संबंधित पहिलं सर्व संशोधन ब्राह्मणांनीच केलेलं होतं. कूळकायदा आल्यानंतर, कसेल त्याची जमीन हे धोरण आल्यानंतर आणि गांधीहत्येनंतर ब्राह्मण समाज देशोधडीला लागला आणि शेतीही देशोधडीला लागली. ब्राह्मणांबरोबरच त्यांचे शेतीतील अनुभव, प्रयोग-तंत्रज्ञानाचं विश्वच संपलं. शेती हा आपला विषय नाही असंच ब्राह्मणांना वाटू लागलं. शेती हा आता पारंपरिक तांदूळ-गहू-ज्वारी-बाजरीच्या शेतीपुरता मर्यादित विषय राहिलेला नाही. आता फळबागायत आणि फुलबागायतीचे तसेच शेतीपूरक उद्योगाचे नवे आयाम त्याला जोडले गेले आहेत. सोलापूरसारख्या शहरामध्ये याच दशकात दोन हजारांहून अधिक ब्राह्मण शेतकऱ्यांचा मेळावा झाला हे विसरून चालणार नाही. ब्राह्मणांमधली नवी उद्योजकता या शेतीपूरक उद्योगाला स्पर्श करू धजते आहे. मंडळाचे अनेक सभासद अशा उद्योगात आहेत. त्यांच्या सहकार्याने शेती-उत्पादन विक्रीचे, कृषी-पर्यटनाचे, गो-उत्पादनांचे नवनवे दालन विकसित केले पाहिजे.

पैसा मिळवणारा ब्राह्मण समाज मुंबईतच नव्हे, तर महाराष्ट्रात, देशात आणि जगात सर्वत्र पसरला आहे. त्याचं नेटवर्क उभारलं जाण्याची गरज आहे. मंडळानं आपल्या सदस्यांचं विस्तारित आर्थिक नेटवर्क उभं केलं पाहिजे. मंडळाचे अध्यक्ष सहकारतज्ज्ञ आहेत. अनेक सहकारी बँका-पतपेढ्या चालवण्याचा, त्यांना मार्गदर्शन करण्याचा त्यांना अनुभव आहे. ब्राह्मण कॅपिटॅलिझमची कल्पना त्यांनी मांडली पाहिजे; ब्राह्मण चेंबर ऑफ कॉमर्स, को-ऑपरेशन अँड इंडस्ट्रीज यासारखी संघटना उभी केली पाहिजे. ब्राह्मणांचा व्हेंचर फंड उभा केला पाहिजे. व्होट बँक पुरे झाली, आता गरज नोट बँकेची आहे. आत्मकेंद्रित बनलेल्या समाजाला लोकाभिमुख बनवण्याची आहे. असंच पहिलं पाऊल त्या दिशेनं टाकण्याचा संकल्प केला पाहिजे.

■




वेचक-वेधक

## आठवणीचे पिंपळ पान



नुकताच सुषमा स्वराज्य यांनी भारत-पाकिस्तान या दोन्ही देशांतील संबंध सुधारावेत, या दृष्टीने पाकिस्तानचा दौरा केला होता. त्या दौऱ्या दरम्यान सुषमा स्वराज्य पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांच्या आईस शमीम अख्तर यांना भेटल्या होत्या. त्या भेटीच्या वेळी दोघींमध्ये खूप रोचक संवाद झाला. त्या वेळी शमीम बी यांनी सुषमा स्वराज्य यांच्याकडून एक वचनदेखील घेतले आणि त्या सुषमाजींना म्हणाल्या, 'तू मेरे वतन से आई है। वादा कर संबंध सुधार के जाएगी।' आणि शमीम बी यांनी सुषमाजींना मिठी मारून कपाळाचे चुंबन घेतले. सुषमा स्वराज्य यांनीदेखील शमीम बी यांचा आशीर्वाद घेताना म्हटले की, 'आपका साया है तो सब अच्छा होगा।' सूत्रांच्या नुसार सुषमा स्वराज्य यांच्याशी गप्पा मारताना शमीम बी यांनी भारताला अनेक वेळा 'मेरा वतन' असे म्हटले. कारण त्यांचा जन्म भारतातील अमृतसरमधील 'भीम का कटरा' इथे झालेला आहे. सुषमा स्वराज्य यांना पाहून शमीम बी खूप भावुक झाल्या होत्या. त्या वेळी त्या असंही म्हणाल्या की, 'बंटवारे के बाद पहली बार मैं ऐसी इन्सान से मिल रहीं हूं जो मेरे 'घर' से यहां आई है। बंटवारे के बाद मैं कभी अपने वतन नहीं गई।'

**संकलन : मनोज आचार्य**


# नेते, नेतागिरी आणि फॅन्सी ड्रेस स्पर्धा!

**प्रकाश अकोलकर**



**महाराष्ट्र टाइम्सचे
वरिष्ठ पत्रकार**
akolkar.prakash@gmail.com

१९९५ साली मनोहर जोशी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी अचानक आपला अर्ध्या बाह्यांचा सफारी सूट खुंटीवर टांगून सुरवार-नेहरू झब्बा आणि जाकीट असा वेष परिधान करायला सुरुवात केली! त्याच वेळी उपमुख्यमंत्री झालेले गोपीनाथराव मुंडे यांनीही आपल्या सुरवार-झब्बा या वेषावर जाकीट घालायला सुरुवात केली. तोपावेतो बाळासाहेब ठाकरे यांनी आपली विविध वेषभूषा बाजूला सारून भगवी लुंगी आणि भगवाच झब्बा, गळ्यात आणि हातात रुद्राक्षाच्या माळा अशी वेशभूषा कायमस्वरूपी धारण केली होती! आपला 'मराठी बाणा' खुंटीवर टांगून हिंदुत्वाची भगवी शाल त्यांनी त्यापूर्वीच म्हणजे १९८०च्या दशकातच खांद्यावर घेतली होती!



भारतातील राजकीय नेते आणि त्यांची वेषभूषा हा या देशातील 'आम आदमी'साठी कायमच कुतूहलाचा विषय राहिला आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे या देशातील राजकारणी हे अगदी अलीकडच्या काळापासून सर्वसामान्य माणसासारखी वेषभूषा करत नसत. महात्मा गांधी यांनी या देशातील दरिद्री नारायणाला सहानुभूती म्हणून कायमस्वरूपी फक्त एक पंचा परिधान करायचा निर्णय घेतला आणि थेट इंग्लंडच्या राणीलाही ते त्याच वेषात जाऊन भेटले, तेव्हा त्यांच्याविषयी समाजात कमालीचा आदरभाव निर्माण झाला होता. मात्र महात्माजींचे प्रथम क्रमांकाचे शिष्य पंडित जवाहरलाल नेहरू, हे मात्र आपले कपडे तसेच अन्य राहणीमान याबाबत कमालीचे सजग होते. ते इंग्लंडमधून बॅरिस्टरकीची पदवी घेऊन परतले, तेव्हा त्यांच्या अंगावर थ्री-पीस सूट होता. मात्र पुढे त्याच खोऱ्याने पैसे ओढणाऱ्या बॅरिस्टरकीवर लाथ मारून त्यांनी पूर्णवेळ राजकारण सुरू केले आणि त्यांची वेषभूषा आरपार बदलून गेली. पंडितजींनी तेव्हाही आपली वेषभूषा फार काळजीपूर्वक निवडली असणार, यात शंकाच नाही. सुरवार, झब्बा, त्यावर नेहरू जाकीट (आता तेच जाकीट नरेंद्र मोदी यांच्या 'ब्रॅण्डनेम'ने विकले जाते, ही बाब वेगळी!) किंवा गुडघ्यापर्यंतची शेरवानी आणि मुख्य म्हणजे त्यावरचे गुलाबाचे फूल असा वेष निवडला होता. महात्माजींनी जसा अंगावर घेतलेल्या पंचाचा आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत त्याग केला नाही, तसंच नेहरूंनीही आपल्या या वेषभूषेत कधीही अपवाद केला नाही.

अमेरिका वा अन्य बहुतेक देशांतील राजकारणी आपला वेष हा 'आम आदमी'च्या वेषभूषेपासून फारसा वेगळा असावा, असा प्रयत्न करताना कधीही दिसत नाहीत. जरा आठवा! बराक ओबामा भारतात आले, तेव्हाही ते तुमच्या-आमच्याप्रमाणे साधा पांढरा शर्ट पँटीत खोचून हिंडतानाच दिसत होते. समारंभाच्या वेळी फक्त ते अंगावर एक कोट घ्यायचे. त्यामुळे ओबामा हे अगदी आपल्यातलेच वाटायचे. मात्र नरेंद्र मोदी यांनी आपल्या अमेरिका दौऱ्यात थेट 'फॅन्सी ड्रेस स्पर्धा'च लावली. अर्थात, या स्पर्धेत त्यांना प्रतिस्पर्धीही ते स्वतःच असायचे! 'नरेंद्र दामोदरदास मोदी' असं नाव विणीत गुंफलेल्या त्यांच्या एका कोटाची तर नको इतकी चर्चाही झाली. पण त्या पलीकडचा एक प्रश्न गेली अनेक वर्षे मनात येतो. आपल्या देशात भारतीय पद्धतीची नीटनेटकी वेषभूषा करणारे हे नेते परदेशात गेल्यावर अचानकपणे सुटात वावरताना दिसतात. त्या पद्धतीच्या कपड्यांची त्यांना सवय नसते आणि एकंदरीतच त्यामुळे त्यांचे रुपडे हे बेंगरूळ होऊन गेलेले बघावे लागते. यशवंतराव चव्हाण तसेच अटलबिहारी वाजपेयी हे अतिशय उत्तम पद्धतीने पायघोळ पद्धतीचे आणि पुढे नीटनेटक्या निऱ्या असलेले रेशीमकाठी धोतर नेसण्याबाबत प्रसिद्ध आहेत. एकेकाळी महाराष्ट्राचं गृहमंत्रीपद गाजवणारे बाळासाहेब देसाईदेखील आपल्या विशिष्ट पद्धतीच्या धोतर नेसण्याबाबत मशहूर होते. मात्र विदेशी भूमीवर पाय ठेवताना यशवंतराव असोत की वाजपेयी की अडवाणी आपल्या अंगावर फूल सूट वा बंदगळा कोट असेल, याची जातीने दक्षता घेत!

तुम्हाला कधीतरी कोणताही विदेशी नेता भारतात आल्यावर

धोतर-शर्ट वा सुरवार-झब्बा वा जाकीट अशा वेषात बघायला मिळाला आहे काय? मग आपल्याच नेत्यांना हा न्यूनगंड का, हा लाखमोलाचा प्रश्न आहे. त्याचे उत्तर आजतागायत मिळालेले नाही. पण एकंदरीतच हे सगळे नेते अचानक विदेशी पेहरावात दिसू लागले की, खरंतर हसायलाच येतं. त्या नेते मंडळींनाही औटघटकेचा हा पोशाख अंगाला निश्चितच डाचत असणार, यात शंकाच नाही.


स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या सहा दशकांत आपल्या देशातील नेते मंडळींची कामकाजाची, वागण्याबोलण्याची रीत जशी बदलत गेली, तसेच बदल त्यांच्या पोशाखातही होत गेले. राजकारणाची शैलीही नेमक्या याच काळात बदलत गेली. कार्यकर्त्यांच्या अंगावरील वस्त्रांचं रूप जसं या काळात बदलत गेलं; त्याचबरोबर पत्रकारांची वेषभूषाही याच काळात बदलत गेली. अवघ्या तीन दशकांपूर्वी बरेचसे पत्रकार आणि विशेषतः बातमीसाठी भटकंती करणारे वार्ताहर हे झब्बा घालत असत आणि त्यांच्या खांद्यावर एक शबनम पिशवी लटकत असे. 'झोळी' अशी संभावना केली जाणारी ही शबनम पिशवी, हे खरंतर तीन दशकांपूर्वीच्या काळातील पत्रकारांची ओळख असे! समाजवादी किंवा डाव्या विचारांच्या कार्यकर्त्यांच्या खांद्यावरही नेमकी अशाच प्रकारची झोळी असे. पुढे पत्रकारांनीही या वेषभूषेचा त्याग केला आणि तेही सर्वसामान्य माणसांप्रमाणे पँट-शर्ट असा वेष परिधान करू लागले. हा अर्थातच एकंदरीतच सर्व क्षेत्रांमध्ये आलेल्या 'कॉर्पोरेट कल्चर'चा परिणाम होता यात शंकाच नाही. त्याच काळात राजकीय नेते तसेच 'नेतागिरी' करू इच्छिणारे कार्यकर्ते यांच्या वेषभूषेतही बदल होऊ लागला आणि तेही 'आम आदमी'च्या पातळीवर येऊ लागले. ठाणे परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे एक नेते जितेंद्र आव्हाड तर थेट आपल्या आजूबाजूच्या तरुणाईला दाद देत, आपल्या अर्ध्या बाह्यांच्या बुशशर्टची दोन बटणे उघडी टाकून फिरू लागले! अखेर त्यांना पक्षात मोठे पद मिळाल्यावर 'आता तरी शर्टाची बटणे लावत जा!' असा सल्ला देणे नेते मंडळींना भाग पडले होते.

थोडक्यात, एकंदरीतच समाज आपल्या वेषभूषेबाबत दिवसेंदिवस सजग होत चाललेला असतानाच, बाळासाहेब ठाकरे यांच्याइतकी विविध वेषभूषा क्वचितच दुसऱ्या कोण्या नेत्यानं अंगीकारली असेल. शिवसेनेची स्थापना करण्याआधी ठाकरे हे एक उत्तम व्यंगचित्रकार होते आणि 'मार्मिक' सुरू करण्याआधी तर ते थेट तुमच्या-आमच्यासारखी एक नोकरी 'फ्री प्रेस जर्नल' या इंग्रजी वृत्तपत्रात करत होते. तेव्हा ते अगदी व्यवस्थित पँटीत शर्ट वगैरे खोचून लोकल ट्रेनने दादरहून चर्चगेटला जायचे. मात्र शिवसेनेची स्थापना झाली आणि बाळासाहेब थेट लेंगा-झब्ब्यावर आले. झब्बाही कसा तर पांढराफेक. बाळासाहेबांची अंगयष्टी कमालीची शिडशिडीत होती. नेतेगिरीला न शोभणारी. मग त्यांनी थेट बंदगळा सुरू


उच्च विचार । शुद्ध आचार
Indus Source Books
संपर्क :- +919403063976 , +919969445950

उच्च विचार । शुद्ध आचार
Indus Source Books
Indian Spirit,Universal Wisdom
Email : info@indussource.com
Website : www.indussource.com

प्रकाशित झाले




हद्दपार आयुष्य भोगणाऱ्या आणि जगाच्या विस्मृतीत गेलेल्या थिबा राजाची व त्याच्या राजपरिवाराची वाचकाला झपाटून टाकणारी ही कहाणी.
लेखिकेच्या अथक आणि सात वर्षांच्या सखोल संशोधनामुळे तसेच अनेक नाट्यमय उदाहरणांमुळे व छायाचित्रांमुळे वाचकांवर गारूड करते.

हद्दपार राजा : थिबा
बर्मी राजघराण्याच्या अवनतीची कहाणी
सुधा शहा
अनुवादः गिरीश जोशी

ISBN: 978-81-88569-76-2
मूल्य- ₹ ६५०
पृष्ठ संख्या ४२७+३२

केला. पँट आणि बंद गळ्याचा सूट. शिवाय, तोंडात सतत पाइप. तेव्हा वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. नाईकसाहेबांचाही डिट्टो म्हणजे अगदी डिट्टो हाच पोशाख होता. शिवाय, नाईकसाहेबांच्या तोंडातही कायम पाइप असायचाच. बाळासाहेबांसारख्या 'क्रिएटिव्ह' कलाकारानं नाईकांच्या या वेषभूषेची कॉपी का केली असावी, देव जाणे! पुढे वसंतराव नाईकांचं मुख्यमंत्रीपद गेलं आणि त्यानंतरच्या काही वर्षांतच बाळासाहेब पुन्हा लेंगा-झब्ब्यावर आले. मात्र या वेळी त्यांच्या खांद्यावर शाल आली होती.

१९८०च्या दशकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात वेगवेगळ्या कारणांनी शिवसेनेचा जोर अचानक वाढू लागला, तेव्हा गळ्यात भगवी उपरणी लटकवून फिरणारे शिवसैनिक गावोगाव दिसू लागले. त्याआधी शिवसैनिकांचं रुपडं हे गावातल्या कोणत्याही पानाच्या वा चहाच्या टपरीभोवती टाइमपास करत असलेल्या तरुणांसारखं असे. मात्र शिवसेनेचा जोर वाढू लागताच या तरुणांनाही आपली ओळख समाजाला पटवून देण्याची गरज भासू लागली असावी. त्यामुळेच त्यांनी हा सीधा-साधा सोप्पा मार्ग अनुसरला असावा. 'शिवसेना' अशी चार अक्षरे असलेल्या या भगव्या उपरण्यांची फॅशन इतकी रूढ झाली की, अन्य पक्षांनीही आपापल्या पक्षांची नावं वा निशाण्या असलेली उपरणी 'मार्केट'मध्ये आणली. सभा-संमेलनं तसेच मेळावे यांत तर अशा पक्षाच्या नाम-निशाण्या असलेल्या उपरणी ल्यायलेल्यांची भाऊगर्दीच दिसू लागली. तशी उपरणी विकणाऱ्यांचे स्टॉल्सही मग सभास्थानाच्या परिसरात लागू लागले. त्यातून त्या पक्षाचं मार्केटिंग कितपत झालं, याबाबत शंका घ्यायला जागा असली तरी अशी उपरणी विकणाऱ्यांची दुकानं मात्र भरभराटीला आली, यात शंकाच नाही!


पुढे काळ झपाट्याने बदलत गेला. राजकारणाची शैलीही आरपार बदलत गेली आणि अण्णा हजारे यांच्या आंदोलनांचं तसंच उपोषणांचं युग आलं. त्यातूनच पुढे अरविंद केजरीवाल नावाच्या नेत्याचा उदय झाला आणि अचानक गांधी टोप्यांना सुगीचे दिवस आले! कोणे एके काळी गांधी टोपी हे नेत्यांचं व्यवच्छेदक लक्षण समजलं जायचं. मराठी सिनेमातले कडक स्टार्चची गांधी टोपी तिरक्या पद्धतीने डोक्यावर ल्यायलेले साखर कारखानदार वा गावाकडचे पुढारी आठवा. पण अण्णा आणि केजरीवाल यांनी त्या टोपीवर 'मैं अण्णा हूँ!' किंवा 'मैं आम आदमी हूँ!' असा मजकूर छापून घेतला. अशा प्रकारच्या 'मैं अमूक हूँ' वा 'मैं तमूक हूँ' छापाच्या टोप्यांची यथेच्छ टिंगल करणाऱ्या भारतीय जनता पक्षालाही अखेर या टोप्यांपुढे शरणागती पत्करणं भाग पडलं. २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी लखनौ, रायबरेली, अमेथी अशा उत्तर प्रदेशातील कळीच्या मतदारसंघांचा धावता फेरफटका मारला असताना, अशा टोप्या भाजप कार्यकर्त्यांच्या डोक्यावरही आढळून आल्या. वानगीदाखल अशीच एक टोपी ल्यायलेल्या भाजप कार्यकर्त्याचे छायाचित्रही टिपण्याचा मोह मग आवरला नाही.

नेते मंडळींना वा कार्यकर्त्यांना नेतागिरी करण्यासाठी अशी वेगवेगळ्या प्रकारची वेषभूषा परिधान करण्याची गरज का भासते, हा खरा प्रश्न आहे आणि जवळपास तीन-साडेतीन दशकं पत्रकारिता केल्यानंतरही त्या प्रश्नाचं उत्तर शोधता आलेलं नाही. खरंतर नेते ओळखले जायला हवेत, ते त्यांच्या कार्यामुळे. पण कोणतंही काम न केलेला नेता वा कार्यकर्ता, जेव्हा 'कार्यसम्राट' असं बिरुद आपल्या नावामागं लावलेले फ्लेक्सचे होर्डिंग्ज आपापल्या मोहल्ल्यात लावण्यात समाधान मानून घेत असतो, तेव्हा मग त्याला आपणच नेता आहोत, हे इतरांच्या मनावर ठसवण्यासाठी आगळ्यावेगळ्या वेषभूषेची गरज ही भासणारच! त्या वेषभूषा स्पर्धेतील पहिलं पारितोषिक नरेंद्र मोदी यांना द्यायचं की, रामदास आठवले यांना याचा निकाल आपण वाचकांवरच सोपवलेला बरा.

भारतीय राजकारण आणि समाजकारण यांची हीच तर खरी शोकांतिका आहे.

■

**वेचक-वेधक**



श्यामाप्रसाद मुखर्जी, दीन दयाल उपाध्याय

## जनसंघ

२१ ऑक्टोबर १९५१ या दिवशी जनसंघाची एका संमेलनात स्थापना झाली. ते संमेलन नवी दिल्लीमधील कनॉट प्लेसपासून पाच मिनिटाच्या अंतरावर असणाऱ्या रघुमल गर्ल्स स्कूलमध्ये भरले होते. (रघुमल गर्ल्स स्कूल ही आर्य समाजाच्या मुलींच्या शाळेतील एक उत्तम शाळा म्हणून गणली जात असे.) त्यामुळे या रघुमल गर्ल्स स्कूलशी भारतीय जनसंघाचे अतूट नाते आहे. जनसंघ म्हणजे भारतीय जनता पार्टीचा मूळ चेहरा. या शाळेत भरलेल्या एका संमेलनातच श्यामाप्रसाद मुखर्जी, दीन दयाल उपाध्याय, मौली चंद्र शर्मा, बलराज मधोक यांसारखे नेते उपस्थित होते. त्या वेळी त्या संमेलनात अशी घोषणा केली गेली की, जनसंघ राजकीय पक्ष म्हणून काम करेल. आणि हा पक्ष राष्ट्रवादी विचारानेच चालेल. १९५२ साली म्हणजे जनसंघाच्या स्थापनेनंतर एका वर्षानेच जनसंघाने लोकसभा निवडणुकीत भाग घेतला आणि तीन जागा जिंकल्या. पुढे आणीबाणीनंतर १९७७ साली जनसंघ हा पक्ष अन्य काही पक्षासोबत जनता पार्टीत सहभागी झाला होता.

**संकलन : मनोज आचार्य**

# काकासाहेब गाडगीळ

## अनंत गाडगीळ



काँग्रेसचे प्रवक्ते
आणि आमदार

*स्वतंत्र भारताच्या पहिल्या १४ सदस्यीय मंत्रिमंडळातील मंत्री, पंजाबचे राज्यपाल. ६२च्या सातारा येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेल्या काकासाहेब गाडगीळ तसेच संरक्षण उत्पादन, नभोवाणी व दळवळण खात्याचे केंद्रीय मंत्री राहिलेले बॅ. विठ्ठलराव गाडगीळ व आता आमदार असलेले अनंत गाडगीळ यांचा तीन पिढ्यांचा राजकारणातील अनुभव कथन करणारा हा लेख.*

तो काळ वेगळाच होता! हे वाक्य प्रत्येक अगोदरची पिढी पुढच्या पिढीला ऐकवत असते. कौटुंबिक गोष्टींपासून ते व्यवहारातील गोष्टीपर्यंत दोन पिढ्यांमध्ये तुलना ही केलीच जाते. यामध्ये सत्यता व वास्तव यावर पिढीचा अभिमान हा कळस ठेवल्यागत असतो. पिढ्यान्‌पिढ्या हे चालूच आहे.

देशाच्या आणि काँग्रेसच्या सेवेला वाहून घेतलेल्या आमच्या गाडगीळ घराण्यात मात्र प्रत्येक पिढीबाबतचा अनुभव खरोखरीच वेगळा आहे.

काकासाहेबांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. काकासाहेबांचे वडील रेल्वेत नोकरीला. त्यामुळे सुरुवातीचं आयुष्य फिरतीचेच राहिले. कायद्याचे शिक्षण पूर्ण होताच एकीकडे पुण्यात स्थायिक होत असतानाच, दुसरीकडे महात्मा गांधीच्या विचारांनी प्रेरित होऊन देशाच्या स्वातंत्र्यलढ्याकडे काकासाहेब ओढले जाऊ लागले. पुढे तर प्रत्यक्षात आंदोलनात उडी घेतली आणि कधी सहा महिने तर कधी अठरा महिने अशी आयुष्यातली जवळपास १०-१२ वर्षे ब्रिटिश सरकारविरुद्ध लढल्याबद्दल तुरुंगात काढली. तुरुंगातून जेव्हा जेव्हा सुटका होई, तेव्हा तेव्हा पुण्याच्या जिल्हा न्यायालयात वकिली करत त्यांनी संसार चालविला. तो काळ वेगळाच होता. त्या वरील निबंधाचा हा जणू पहिला परिच्छेद.

काकासाहेबांच्या पिढीचे एक विलक्षण उदाहरण जर द्यायचे झाले, तर ते माझी आजी आनंदीबाईंचे. माझ्या वडिलांच्या तरुणपणीच ती वारल्यामुळे मी तिला पाहण्याचा प्रश्नच येत नाही. फारशी शिकलेली नसताना तिच्या धडाडीच्या गोष्टी अनेक जुनी मंडळी सांगतात. स्वातंत्र्यपूर्व काळातील ही घटना. पुण्यातील शनिवार पेठेतील आमचं घर म्हणजे गाडगीळ वाडा. एके दिवशी ब्रिटिश पोलिसांनी केवळ वाडाच नव्हे, तर त्या अख्ख्या मेहूणपुरा परिसराला वेढा घातला. आजोबांच्या अटकेचे वॉरंट घेऊन पोलीस घरात शिरले.तेव्हा ''मी सुद्धा माझ्या नवऱ्याला गेली चार-पाच दिवस शोधत आहे.'' अशी चक्क थाप मारत तिने पोलिसांना दारातच १५-२० मिनिटे बोलत ठेवले. कारण वरच्या मजल्यावर एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे, काकासाहेब इत्यादी सर्व सत्याग्रही लपून बसले होते. प्रत्येकाने त्या १५-२० मिनिटांत वेषांतर केले व वाड्याच्या मागे असणाऱ्या देऊळाच्या भिंतीवरून उडी मारून सर्व पसार झाले.

काकासाहेबांचे राहणीमान अगदी साधे. प्रचंड लोकसंग्रह. दर सोमवारी घरापासून दहा मिनिटांच्या अंतरावर असलेल्या



ओमकारेश्वर मंदिरात दर्शनासाठी पायी चालत जायचे. पण हा दहा मिनिटांचा प्रवास प्रत्यक्षात तासभराचा व्हायचा. कारण वाटेत भेटणाऱ्या प्रत्येकाशी बोलणे हे त्यांचे नित्याचे. आजच्या पिढीतल्या राजकारण्यांकडून हे क्वचितच अनुभवायला येते.

राजकारणापासून एक प्रकारे निवृत्ती स्वीकारल्यानंतर मृत्यूच्या काही दिवस अगोदर प्रभात टॉकीजसमोरच्या बसस्टॉपवर बससाठी थांबलेल्या काकासाहेबांना पाहून अनेकांच्या डोळ्यांत आदरपूर्वक अश्रू आले. 'राजसत्तेची वस्त्रे मी आता काढून टाकली आहेत. आता मी एक सामान्य पुणेकर आहे.' अशी धाडसी प्रतिक्रिया त्यांनी दिली. काकासाहेबांचे हे आचरण राजकीय सोडाच, पण इतर कुठल्याच क्षेत्रातील आजच्या पिढीकडून घडणे शक्य होणार नाही.

काकासाहेब तुरुंगात असताना जवळपासचे लोक, नातेवाईक इत्यादी काकासाहेबांच्या संसाराला हातभार

लावायचे. वडिलांच्या सुरुवातीच्या निवडणुकीच्या काळातही अशाच प्रकारचे प्रत्यंतर आले. अमेरिकेतून नोकरी-शिक्षण पूर्ण करून मी ८०च्या शेवटी भारतात परतलो त्याच सुमारास लोकसभेची निवडणूक लागली. पुण्याच्या त्या वेळच्या महापौरांना घेऊन मी भवानपेठेत रात्री उशिरा प्रचार करत होतो. अचानक माझे लक्ष एका विजेच्या खांबावर चढलेल्या काँग्रेसच्या कार्यकर्त्याकडे गेले. पक्षाचा झेंडा व वडिलांचा फोटो ते कार्यकर्ते खांबावर लावत होते. मला त्यांची कीव आली व मी खिशातून १०-२० रुपये काढून त्यांना दिले. कार्यकर्त्यांनी ते पैसे माझ्या अंगावर भिरकावले व मला वर सुनावले, 'अनंतराव भले तुमचे वडील असतील, पण ज्या काँग्रेसचे ते उमेदवार आहेत त्याच पक्षाचे आम्ही कार्यकर्ते आहोत. आम्ही आमचे कर्तव्य बजावत आहोत.' केवळ काँग्रेसच नव्हे, तर आज प्रत्येक राजकीय पक्षातील नेत्यांना कार्यकर्त्यांवर खर्च केल्याशिवाय पुढे जाताच येत नाही. माझ्यासारख्यांची तिथेच ससेहोलपट होते. राजकारणातील




पुढच्या पिढ्यांना येणारा हा अनुभव दुर्दैवी म्हणावा लागेल.

वडिलांची पिढी म्हणजे तत्त्वाने वागणारी. देशातील आर्किटेक्चरच्या एका मोठ्या संस्थेत मला प्रवेश हवा होता. केवळ २५ मार्क कमी पडत होते. वडिलांना मी म्हटले, 'खासदार आहात. प्रिन्सिपॉलला फोन करा. काम होईल.' वडिलांनी नकार दिला. त्या वेळी मी वडिलांवर नाराज झालो. पण दुसरीकडे त्यांच्या या तत्त्वामुळेच माझ्यात जिद्द निर्माण झाली आणि अमेरिकेतील नामांकित विद्यापिठातून मी उच्च शिक्षण पूर्ण करू शकलो. आज कमी मार्क असूनही अमक्याला प्रवेश द्या,अशी शिफारसपत्र हल्लीच्या लोकप्रतिनिधींना नाइलाजाने विविध प्रिन्सिपॉल्सना द्यावी लागतात.

सध्याच्या राजकीय-सामाजिक परिस्थितीचे अचूक वर्णन वडिलांनी १५-२० वर्षांपूर्वीच केले होते. ते म्हणजे ''सत्तेतून पैसा आणि पैश्यातून सत्ता'' मी गेल्या वर्षी प्रथमतः आमदार झाल्यावर मला जे ओळखपत्र दिले गेले त्यावर लिहिले होते,

**वेचक-वेधक**

## एक अविस्मरणीय क्षण



आज पूर्ण देशातील जनता फक्त एकाच गोष्टीवर चर्चा करताना दिसते की, संसदेत शासनकर्ता पक्ष आणि विरोधी पक्ष सदनाचे कार्य नीट चालून का देत नाहीत? नेहमीच विरोधाला विरोध करून विरोधी पक्षाचे नेते गोंधळ का घालतात? मात्र १९७१ साली एकदा असे घडले की, लोकसभेत शासनकर्ता पक्ष आणि विरोधी पक्ष एका मुद्द्यावर एकत्र आले होते.

१९७१ मध्ये अटल बिहारी वाजपेयी विरोधी पक्ष नेता होते आणि इंदिरा गांधी ह्या भारत देशाची पहिली स्त्री पंतप्रधान म्हणून देशाचे नेतृत्व करीत होत्या. त्यावेळी अटल बिहारी वाजपेयी यांनी विरोधी पक्ष नेता म्हणून, एक पाऊल पुढे जाऊन इंदिरा गांधींना 'दुर्गा' म्हटलं. वाजपेयी यांनी हे शब्द इंदिरा गांधींसाठी त्या वेळी वापरले, जेव्हा १९७१ साली भारताला पाकिस्तानशी लढाई करताना विजय प्राप्त झाला होता. त्या वेळी पाकिस्तानच्या ९०,३६८ सैनिकांनी आणि नागरिकांनी आत्मसमर्पण केले होते. त्या वेळी सदनात अटल बिहारी वाजपेयी म्हणाले होते की, 'या लढाईत इंदिरा गांधींनी ज्या प्रकारे आपली भूमिका समर्थपणे पार पाडली. त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे.' खरंतर त्या वेळी सदनात त्याच युद्धाबाबत चर्चा चालू होती. मात्र त्या वेळी वाजपेयी म्हणाले की, 'ही चर्चा सोडा आणि इंदिरा गांधींच्या भूमिकेवर लक्ष द्या आणि त्यांच्या भूमिकेवर बोला. कारण अशी भूमिका केवळ दुर्गाच घेऊ शकते.' आणि त्यांनी एक कविता इंदिरा गांधीसाठी म्हटली की, तू इंदिरा नही दुर्गा है...

आजच्या आधुनिक काळातील राजकारणात मात्र संकुचित मानसिकता घेऊन काम करणारा विरोधी पक्ष, कधीतरीच (म्हटले तर अगदी दुर्मीळ) शासनकर्त्या पक्षाच्या नेत्याने घेतलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचे कौतुक करीत असेल. मात्र अटल बिहारी वाजपेयी यांनी त्या काळी शासनकर्त्या पक्षाच्या नेत्याने घेतलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचे मोठ्या मनाने कौतुक करून एक नवीन आदर्श उदाहरण घालून दिले होते.

**संकलन : मनोज आचार्य**

‘बेस्ट’ बसनं प्रवास करण्याची मुभा. आश्चर्य वाटले म्हणून विधिमंडळात चौकशी केली. एक सचिव म्हणाले, ‘१५-२० वर्षांपूर्वी अनेक आमदार रेल्वेने व्हि.टी. स्टेशनला उतरून बेस्टच्या बसने विधानभवनात यायचे.’ अर्थात आता सर्वसामान्यांचेही राहणीमान बदलले आहे. सर्वसाधारण घरामध्ये वाहन ही अत्यावश्यक बाब झाली आहे.

वडिलांच्या निवडणुकीत दररोज प्रचार संपवून परतणाऱ्या कार्यकर्त्यांना आम्ही घरी भेळ देत असू. तरीही केवढे दिले असे वाटायचे. हल्ली काही उमेदवारांचे कार्यकर्ते बिर्याणी दिल्या-शिवाय हलतच नव्हते असे दृश्य होते.

पूर्वी मंत्री-खासदार-आमदारांना काम सांगायला लोकांना संकोच वाटायचा. हल्ली काहीजण लोकप्रतिनिधींकडे काम घेऊन येतात व निर्लज्ज व बेधडकपणे सांगतात. ‘साहेब, हे काम करा, बाकी तुमचे काय असेल ते आम्ही पूर्ण करू.’ आजोबा-वडिलांच्या पिढीत लोक काम सांगताना ‘विनंती’ करायचे. हल्ली. आम्ही तुम्हाला निवडून दिले आहे. तेव्हा आमचा हक्क आहे, या आविर्भावातच लोक काम सांगतात. पूर्वी विरोधकांवर वैचारिक टीका केली तरी वैयक्तिक जीवनातील दोस्ती कायम असायची. हल्ली काही वेळा विरोध केला, तर ते शत्रुत्व मानले जाते.

राजकीय घराण्यात जन्म घेतल्यावर येणारे अनुभव फार गमतीशीर असतात. अमेरिकेतून एवढे शिकून आलात मग कशाला या राजकारणाच्या घाणेरड्या खेळात शिरलात, असे अनेकदा ऐकावे लागते. मात्र त्याच वेळेला अधिकाधिक सुशिक्षित लोक जर राजकारणात आले, तर राजकारणाचा दर्जा बदलणार नाही का? हा विचार करताना कोणी दिसतच नाही. माझी स्वतःची एक गाडी १०-१२ वर्षांची जुनी आहे. मित्र मागे लागले आहेत की आता नवीन घे. पण मनात भीती ही आहे की, नवीन गाडी घेतल्यास माझा आर्किटेक्ट म्हणून जो व्यावसायिक पसारा आहे, त्यातून मी गाडी घेतली हा विचार कोणी करणार नाही. उलट म्हणणारे म्हणतील, ‘बघा आमदार होऊन वर्ष नाही झाले, तो नवीन गाडी घेतली.’


काकासाहेबांची पिढी सामाजिक बंधने तोडून विचार करणारी होती. पुण्यातील ऐतिहासिक पर्वतीचे मंदिर दलितांना खुले नव्हते. ते खुले करण्याचा सत्याग्रह कुणी केला, तर तो काकासाहेबांनी म्हणजेच एका गाडगीळांनी. नुकत्याच संपलेल्या नागपूर अधिवेशनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जन्मदिनानिमित्ताने संविधानावर विधान परिषदेमध्ये चर्चा होती. काँग्रेस पक्षातर्फे वक्त्यांमध्ये माझेही नाव दिले होते. माझे भाषण संपल्यावर गाडगीळ असूनही आंबेडकरांवर सुंदर बोललात, ही भाजपच्या एका नेत्याची सभागृहाबाहेरील प्रतिक्रिया बरेच काही सांगून जाते.

■



नवचैतन्य प्रकाशन

संपर्क-न्यू गजांत को.ऑ.हौ.सो.लि. ब्लॉक नं.सी-११, तळमजला, कोसांम्गो नक्षर कोरा केंद्र फ्लायओव्हर जवळ, एस.व्ही.रोड बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९२ दूरध्वनी-०२२-२८६४५२१२ ,२८६३५२१२


नवचैतन्य प्रकाशनाची लक्षवेधी पुस्तके




नरेंद्रायण
व्यक्ती ते समष्टी एक आकलन
डॉ. गिरीश दाबके
मूल्य-२८५-/



राज्यसभेत खासदार मनोहर जोशी
डॉ.मनोहर जोशी
मूल्य -२८०-/




शिवसेनेची निर्मिती,वाढ,स्वरुप,
यशापयश आणि भवितव्य
मनोहर जोशी
मूल्य -३००-/



२०-५०-७५
डॉ.मनोहर जोशी
मूल्य -६००-/



हिंदुहृदयसम्राट
उन्मेश गुजराथी
मूल्य -३८०-/



प्रतिभावान राष्ट्राध्यक्षा
जगदीश भोवड
मूल्य-१५०-/


# सीबीआयचा राजकीय वापर थांबणे लोकशाही टिकण्यासाठी अनिवार्य

## दिलीप चावरे

ज्येष्ठ पत्रकार
patrakar@hotmail.com



सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन म्हणजे सीबीआय ही संस्था गेली अनेक वर्षे गुन्हेगारीची चौकशी करणारी देशातील सर्वोच्च यंत्रणा म्हणून काम करीत आहे. स्थापनेपासूनच ही यंत्रणा वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. सीबीआय थेट केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे सीबीआयवर सतत पक्षपाताचे आरोप होत असतात. दिल्लीतील सत्ताधीश कायम सीबीआयचा दुरुपयोग करतात असे आरोप वेळोवेळी केले गेले आहेत. देशात राजकीय




अस्थिरता निर्माण झाल्यापासून आणि प्रादेशिक पक्ष देशाच्या धोरणात प्रभाव पाडण्याएवढे मजबूत झाल्यापासून सत्तेच्या अंगणात सीबीआयला नवीन भूमिका मिळाली आणि सीबीआयचा सरसकट गैरवापर सुरू झाला. कायद्यानुसार सीबीआयला कोणत्याही प्रकरणाचा तपास करायचा असल्यास संबंधित राज्य शासनाने त्याला अनुमती द्यावी लागते. काही प्रकरणी न्यायालयही तसे आदेश देऊ शकते. मात्र असा तपास केंद्र सरकारच्या, म्हणजे खरेतर पंतप्रधानांच्या, आदेशानुसार काम करीत असलेली सीबीआय करीत असल्यामुळे केंद्र सरकारच्या राजकीय गणिताप्रमाणे त्याबाबत विविध चर्चा होत असते.

केवळ दीड वर्षापूर्वी तत्कालीन सत्ताधारी काँग्रेस आणि प्रमुख विरोधी असलेला भारतीय जनता पक्ष यांच्यात तीव्र युद्ध सुरू झाले. दोन्ही पक्षांनी यात अत्यंत आक्रमक भूमिका घेतली असली तरी, ही आक्रमकता केवळ राजकीय होती. आज तसेच आरोप काँग्रेस पक्ष करीत आहे.

आता राष्ट्रीय स्तरावरील काँग्रेसची जागा भाजपने घेतली आहे. इशरत जहां ही तरुणी एक स्वघातक बॉम्ब होती असे डेव्हिड हेडली या आरोपीने आता जाहीर केले आहे. पण तेव्हा तिच्या हत्या प्रकरणात सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्रास केव्हढा राजकीय रंग आला होता, याचे स्मरण करणे आवश्यक आहे. भाजपने सीबीआय केंद्र सरकारच्या हातचे बाहुले झाले असल्याचा आरोप केला. आज काँग्रेस आणि इतर पक्षांनी तोच आरोप सुरू केला आहे. इशरत जहां प्रकरणातील बोलवते धनी कोण आहेत याचा तपास सीबीआयने करावा, अशी मागणी हेच विरोधक तेव्हा करीत असत.

दोन्ही बाजूंनी एकमेकांवर केलेल्या आरोपांमध्ये तथ्य आहे कारण सीबीआयचा राजकीय वापर झाला हे वास्तव आहे. पण ज्याप्रकारे काँगेसने आपले सरकार असताना संसदेत मायावती आणि मुलायमसिंह यादव या दोघांचेही समर्थन प्राप्त केले आहे. त्यानंतर त्यांना सीबीआयवर टीका करण्याचा काय अधिकार आहे, हा प्रश्न बाकी उरतोच. आंध्र प्रदेशमध्ये बंडाळी केली म्हणून जगन रेड्डी कित्येक महिने गजाआड होते. स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक काँग्रेस सत्तेवर असल्याने सीबीआयचा जास्तीत जास्त गैरवापर याच पक्षाने करणे क्रमप्राप्त आहे. सरकार सीबीआयचा सूड बुद्धीने वापर करीत असल्याच्या वापरास त्यामुळे बळ लाभते.

आपले राजकीय अस्तित्व शाबूत राखण्यासाठी सरकारला जाहीर स्तरावर विरोध करायचा आणि सरकारने आपल्याला अभय द्यावे, म्हणून सभागृहात त्याची पाठराखण करायची अशी कसरत सुरू झाली. सरकार सीबीआयचा राजकीय वापर करते असा समज त्यामुळे दृढ झाला. हा अपप्रचार एवढ्या प्रभावीपणे झाला की सर्वसामान्य माणसेही काय, राजकीय कार्यकर्तेही सीबीआय म्हणजे सरकारच्या हाती असलेले ब्रह्मास्त्र असल्याचे मानू लागली.

विद्यमान राजकारणात कोणत्याही राजकीय पक्षाला आपल्याकडे वैचारिक अथवा तात्त्विक पाया असल्याचा प्रामाणिक दावा करता येणार नाही. राजकारणात तडजोडी कराव्या लागतातच अशी मखलाशी प्रत्येक पक्ष करीत असतो. अगदी अलीकडचा इतिहास पाहिल्यास अटल बिहारी वाजपेयी

यांच्या रालोआ सरकारने बहुमतासाठी शिबू सोरेन, जयललिता यांना आपल्यामागे ठेवण्यासाठी सीबीआयचा वापर केल्याचा आरोप कायम होत गेला. काँग्रेसची सत्ता येताच सीबीआय हा पोरखेळ वाटू लागला. लालू प्रसाद यादव, मायावती, मुलायम सिंह अशा नामचीन नेत्यांना सीबीआयची भीती दाखवून आपल्या कच्छपी लावण्यात आले.

आपण देशाच्या घटनेचा आणि कायद्याचा अभ्यास केल्यास असे दिसेल की, प्रत्यक्षात सीबीआय ही केंद्रीय तपास संस्था आहे. कर्तबगार अधिकारी तेथे काम करतात. व्यवहारात केंद्र सरकारचा प्रभाव या यंत्रणेवर असतोच. पण त्यामुळे सीबीआय केंद्र सरकारची अंकित असते असा निष्कर्ष सोयीचा असला, तरी ते न्यायसंगत म्हणता येत नाही. यामधील मर्यादा सर्वांनी जपावी अशी घटनाकारांची अपेक्षा होती. आपण प्रत्येक क्षेत्रात हिणकस वागत असल्याने सीबीआयसुद्धा त्यास अपवाद करता येत नाही. हे कटू असले तरी सत्य आहे.

देशाची घटना गेल्या ६६ वर्षांत आपण एवढी विटंबीत केली की सामान्य लोकांना कायद्याबद्दल आदरच वाटेनासा झाला. घटना धाब्यावर बसवून राजकारण आणि उद्योग-धंदे सुरू झाल्याने घटना निष्प्रभ ठरेल असे समज घट्ट होऊ लागले. आता गुन्हेगारही सीबीआयच्या विश्वासार्हतेला आव्हान देऊ लागले आहेत. ही परिस्थिती भयकारक आहे.

आपल्या घटनेनुसार सीबीआय केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली आहे. एखाद्या प्रकरणी सीबीआयने तपासात किती प्रगती केली आहे, कोणते निष्कर्ष काढले आहेत हे जाणून घेण्याचा अधिकार सरकारला आहे. कारण सरकारला न्यायालयात आपली बाजू मांडणे आवश्यक असते. सीबीआयच्या स्वायत्ततेसाठी अनेकांनी आग्रह धरला होता आणि आहे. देशभर या मागण्यांची चर्चा झाली आहे. स्वायत्त लोकपाल आणि सीबीआयला स्वायत्तता या लोकशाहीप्रेमी जनतेच्या प्रमुख मागण्या आहेत. तथापि सीबीआयला स्वायत्तता देऊ नये, याबाबत सर्व पक्ष अत्यंत आग्रही आहेत. जाहीरपणे ते जरूर म्हणतात की सीबीआयचा दुरुपयोग नको. प्रत्यक्षात मात्र सीबीआयला स्वायत्तताही देऊ नये, हीच बहुतेक सर्व पक्षांची भूमिका आहे. म्हणून हे घोंगडे भिजत पडले आहे.

यामागे एक महत्त्वाचा विचारही आहे. अनेक स्वायत्त संस्था एकाच वेळी कार्यरत असल्या, तर घटनेची कार्यवाही विस्कळीत होते आणि अराजकास आमंत्रण मिळू शकते. अशी कित्येक उदाहरणे आहेत. या कारणाने सीबीआयला स्वायत्तता देण्यास प्रमुख राजकीय पक्ष विरोध करीत असताना न्यायालयाने पिंजऱ्यातील पोपट अशी सीबीआयची संभावना करणे हा आणखी धोका आहे. गेल्याच आठवड्यात न्यायालयाने उत्तर प्रदेश शासनाला लोकायुक्त नेमायचा आदेश दिला. तत्पूर्वी निवडणूक लढवण्यासाठी अमुक शिक्षण पाहिजेच अशी तरतूद घटनेच्या चौकटीत असल्याचा निर्णय दिला. सलमान खान प्रकरण तर बहुचर्चित आहेच. न्यायालय कोणते आदेश देऊ शकते? घटनेच्या मूलभूत ढाच्यामध्ये बदल करण्याचा अधिकार न्यायालयास आहे की नाही? या पार्श्वभूमीवर न्यायालयास सीबीआयला स्वायत्त करा असा आदेश देण्याचा अधिकार आहे का? तो न्यायालयाने वापरला तर राजकीय पक्ष त्यास मान्यता देतील का?

सर्वोच्च न्यायालयाने सीबीआय आणि केंद्र सरकार यांची कठोर, कडवट शब्दात हजेरी घेतली आहे. न्यायालयाच्या भूमिकेमुळे सरकारला नियंत्रण म्हणजे हस्तक्षेप नव्हे, हे भान येण्यासाठी योग्य इशारा मिळाला आहे. या देशाची घटनाच देश वाचवू शकेल, पण ते घटना राबवणाऱ्यांवर अवलंबून राहील असे डॉ. आंबेडकर यांनी घटना लिहिताना म्हटले होते. ती घटना जतन होणे आवश्यक आहे.

सीबीआय राजकीय विरोधकांचा काटा काढण्यासाठी वापरली जात आहे असा आरोप सतत होणे लोकशाहीस शोभत नाही. आणीबाणी आणि नंतरच्या काळातही काँग्रेसने सीबीआयचा वापर करून घेतला. आज देशात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. लाखो गंभीर गुन्हे न्यायालयात पडून आहेत. त्यांचा तपास पूर्ण होण्यासाठी अशा सीबीआयसारख्या यंत्रणांचा प्रत्येक स्तरावर उपयोग व्हायला हवा. तो न झाल्यास सर्वसामान्य नागरिकाचा तपास यंत्रणांवरचा विश्वास उडून जाईल.

■

**वेचक-वेधक**

## भारतीय जनता पार्टी

भारतीय जनता पार्टीचे मूळ हे श्यामाप्रसाद मुखर्जींद्वारा १९५१ साली निर्मित झालेल्या भारतीय जनसंघात आहे. १९७७ साली जनसंघ हा जनता पार्टीत सहभागी झाला होता. पुढे १९८० साली जनता पार्टी विघटित झाली आणि पूर्व जनसंघाच्या पदचिन्हांना पुनर्संयोजित करून भारतीय जनता पार्टीची निर्मिती झाली. सुरुवातीस पार्टीस सफलता मिळाली नाही. १९८४च्या लोकसभा निवडणुकीत फक्त दोन जागा प्राप्त झाल्या. त्यानंतरच्या झालेल्या राम जन्मभूमी आंदोलनात पार्टीची ताकद वाढली. त्यानंतर काही राज्यांत निवडणुका जिंकल्यानंतर, १९९६ साली राष्ट्रीय पातळीवर निवडणुकीत चांगले प्रदर्शन करतानाच पार्टी भारतीय संसद भवनात सगळ्यात मोठी पार्टी म्हणून गणली गेली आणि तिने सरकार स्थापले. पण दुर्दैवाने ते फक्त तेरा दिवस टिकले.

**संकलन : मनोज आचार्य**

# राजकीय पार्श्वभूमी असलेले निवडक मराठी आणि हिंदी चित्रपट

**मनोज आचार्य**

'इंडस सोर्स बुक्स' प्रकाशन
मराठी विभागाचे संपादक
manoj.acharya90@gmail.com



नागरिक स्तरावर किंवा व्यक्तिगत स्तरावर अन्य व्यक्तींना प्रभावित करण्याचा सिद्धान्त तसेच व्यवहार म्हणजे राजकारण. अधिक संकीर्ण रूपात सांगायचे झाले, तर विशिष्ट नीतीने शासनात पद प्राप्त करणे, सरकारी पदाचा अनेक प्रकारे उपयोग करणे म्हणजे राजकारण. राजकारणात अनेक मार्ग अवलंबले जातात. जसे लोकांत आपले वैयक्तिक राजकारणाचे विचार पेरणे, स्वत:चा कायदा बनवणे, विरोधकांच्या विरुद्ध स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी माणुसकी न बाळगता युद्ध, कूटनीती इत्यादी शक्तींचा उपयोग करणे. तसे राजकारण अनेक स्तरांवर होत असते. त्या अर्थाने राजकारण हे तर जळी-स्थळी असते. अगदी आपल्या घरापासून दुकाने-बाजार, कार्यालयांपर्यंत सगळीकडे असते. तुम्ही आम्ही सारेचजण त्यात असतो! कारण एकूणच समाजाला राजकारण करायला आणि ते लांबून पाहायला आणि त्याची मजा घ्यायला आवडत असते. फक्त कोणाला दाखवताना 'आम्हाला काय कळतंय राजकारण? आम्ही तर राजकारणापासून चार हात लांबच असतो.' असे म्हणायची मानभावीपणाची प्रथादेखील रूढ आहे. मात्र ते काही खरे नाही. थोडक्यात राजकारण ही पाच अक्षरे अशी आहेत, की जी भारतीय जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून राहिली आहेत.




राजकारणावर आधारित विषय आणि उपहास हा भारतीय चित्रपटांसाठी नेहमीच चर्चेत राहिलेला विषय आहे. राजकारणातील वाईट गोष्टींवर अशा चित्रपटांमध्ये भाष्य केलेले दिसून येते किंवा तसा प्रयत्न तरी केलेला दिसून येतो. मात्र काही जागतिक चित्रपटांनी तर वास्तवातल्या सामाजिक-राजकीय गुंतागुंतीचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण केले आहे की त्या धाडसाला तोड नाही. उदाहरणार्थ, 'मॅन विथ अ मूव्ही कॅमेरा' (दिग्दर्शक - झिगा वर्तोव, १९२९), 'द ट्रायम्फ ऑफ द विल' (दिग्दर्शिका - लेनी राफेनथाल, १९३५, हिचा उल्लेख वर आलेला आहेच.), 'द इटर्नल ज्यू' (दिग्दर्शक - फ्रित्झ हिपलर, १९४०), 'बॅटल ऑफ अल्जीयर्स' (दिग्दर्शक - गिलो पोन्टेकोर्वो, १९६६), 'झेड' (दिग्दर्शक - कोस्टा गावरा, १९६९), 'इफ' (दिग्दर्शक - लिंडसे अँडरसन, १९६९), 'फिअर्स ईट्स द सोल' (दिग्दर्शक - रेने वेर्नर फासबाइंडर, १९७४), 'रेड्स' (दिग्दर्शक - वॉरेन बीटी, १९८१), 'हानुसेन' (दिग्दर्शक - इस्तवान झाबो, १९८८) इत्यादी. भारतीय चित्रपटसृष्टीतही अशी उदाहरणे सापडतात, पण एकूण राजकीय चित्रपटांचे धाडसी दर्शन आपल्याकडे फारसे झालेले नाही, हेदेखील सत्य आहे. राजकीय टिप्पणी करणारा, प्रस्थापित राजकीय व्यवस्थेचा निषेध करणारा सिनेमा करणे हे सोपे काम नाही. राजकीय टीका करणारा लेख लिहिण्याइतके किंवा भाषण करण्याइतके ते सोपे नाही. चित्रपट-निर्मिती हीच मुळात प्रदीर्घ, खर्चीक आणि विविध घटकांना, मोठ्या मनुष्यबळाला बरोबर घेऊन करावी लागणारी प्रक्रिया. तिचे प्रदर्शनही अधिक मोठ्या समूहापुढे होणार असते. अशा परिस्थितीत देशातल्या प्रस्थापित राजकीय व्यवस्थेवरच भाष्य करणे हे धाडसाचे, धोक्याचेही ठरत आले आहे. तरीही राजकीय पार्श्वभूमीचे अनेक मराठी आणि हिंदी चित्रपट आले

पुढेदेखील येतील. मात्र त्यातील काही चित्रपटांनी प्रेक्षकांच्या मनात किमान स्थान तरी निर्माण केले अशा चित्रपटांचा हा एक धावता आढावा.

मराठी चित्रपट 'सिंहासन'चा विचार करताना आधी अरुण साधूंचा विचार करावाच लागतो. त्यांच्या 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन' ह्या दोन कादंबऱ्यांतील निवडक प्रसंगांवर आधारित 'सिंहासन' हा चित्रपट. मराठी चित्रपटात मग 'वजीर', 'सरकारनामा' अलीकडचा 'आजचा दिवस माझा' असे राजकीय पार्श्वभूमीचे चांगला प्रयत्न असलेले चित्रपट आले, पण 'सिंहासन'ची सर कुणालाच नव्हती. कारण 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन' या अरुण साधूंच्या वेगळ्या धाटणीच्या मूळ कादंबऱ्यांतून. राजकारण, समाजकारण, कामगार संघटना यांची तिरंगी बंडाळी यात दिसते शिवाय सामाजिक जीवनातील, प्रत्यक्षाप्रत्यक्ष राजकारणातील जे अंतःस्रोत आहेत. हे अंतःस्रोत ज्या चिवटपणे परस्परांच्या जगण्याला छेदून-भेदून समोर येतात, ते अधिक प्रत्ययकारी ठरतात. या दोन्ही कादंबऱ्यांतून महाराष्ट्रातील तत्कालीन राजकारण मुखर झाल्याने राजकीय कादंबरीचा प्रवाह जोमाने सुरू करण्याचे श्रेय साधू यांना जसे मिळाले, तसेच श्रेय वेगळा राजकीय चित्रपट म्हणून डॉ. जब्बार पटेल यांनाही मिळाले होते. 'मुंबई दिनांक' मध्ये साधू सर्वसामान्यांच्या जगण्याला भेदून टाकणाऱ्या राजकारणाचे अंतःस्रोत दाखवून देतात. तर 'सिंहासन'मध्ये सत्ता आणि सत्तेची लालसा यांभोवती फिरणारे राजकारण, डाव आणि प्रतिडाव, जनतेचा विश्वासघात, सत्तेच्या खुर्चीसाठी माणुसकीही खुंटीला टांगून ठेवणाऱ्या प्रवृत्तींचे ते प्रभावी दर्शन घडवतात. आज 'सिंहासन' कादंबरीला प्रकाशित होऊन बरीच वर्षे झाली आहेत. त्यातून आजच्या राजकारणाचा पोतसुद्धा बदलला आहे, तरी राजकारण मात्र तशाच पद्धतीने किंबहुना अधिक खालच्या पातळीवर चालू आहे. कालानुरूप राजकारणाचे आणि निवडणुकांचे स्वरूप तसेच प्रवाह बदलत आहेत. राजकारणाचा जो चेहरामोहरा आपण आजवर पाहत आलो तो येणाऱ्या काळात कितीतरी पटीने बदलू शकतो. साधू यांनी काही वर्षांपूर्वी द्रष्टेपणाने हा खेळ किती अचूक टिपला होता, हे मात्र या कादंबऱ्यांमुळे ध्यानात येते.

'सिंहासन'ने मराठी चित्रपटाचे विषय बदलण्याचीदेखील सुरुवात केली, असे म्हणायला हरकत नाही. १९७० चा कालखंड आंदोलने आणि चळवळींचा होता. चळवळींबद्दल साधू यांना आत्मीयता असली तरी, ते त्यात कधी प्रत्यक्ष सामील झाले नाहीत. नेहरू-गांधींच्या भूमिकांचे ते समर्थन करीत असले तरी ते काँग्रेसवाले नाहीत. मनाने बंडखोर असले तरी आक्रस्ताळे नाहीत. सामाजिक न्यायाच्या बाजूने आणि निधर्मी राजकारणाचे ते पुरस्कर्ते आहेत. काहीसे डावे असले तरी उदारमतवादाच्या बाजूचे आहेत. एकतर 'सिंहासन' चित्रपटामध्ये खूप पात्र आहेत. त्यात सिनेमा इतका वेगवान आहे की पहिल्यांदा बघताना थोडा त्रयस्थपणे बघताच येत नाही. म्हणजे असे समजा की तुम्ही, एकामागोमाग एक चाली रचून चाललेला, बुद्धिबळाचा डाव बघताय. तुमच्याही नकळत तुम्ही त्यात ओढले जाता. त्रयस्थपणे चाली समजून घेऊन त्यांचे विश्लेषण करणे जमत नाही. तरीही 'सिंहासन' चित्रपटाची कथा आणि त्यातील कलाकारांच्या अभिनयाची बाजू पाहता दिग्गज निळू फुले (दिगू टिपणीस), अरुण सरनाईक (मुख्यमंत्री जिवाजीराव शिंदे), डॉ. श्रीराम लागू (अर्थमंत्री अप्पासाहेब तथा विश्वासराव दाभाडे), दत्ता भट (शेतकीमंत्री माणिकराव पाटील), सतीष दुभाषी (कामगार पुढारी डिकास्टा), मधुकर तोरडमल (दत्ताजी), श्रीकांत मोघे (आनंदराव), माधव वाटवे (विधानसभेचे सभापती नाना गुप्ते), डॉ. मोहन आगाशे (बुधाजीराव), लालन सारंग (मिसेस चंद्रापुरे), जोडीला तेव्हाचे नवखे पण नंतरचे दिग्गज नाना पाटेकर (स्मगलर शेठचा हस्तक), रिमा लागू (अर्थमंत्र्यांची सून). अगदी न्हाव्याच्या छोट्या भूमिकेत राजा मयेकरांनीही बहार आणलीय. 'सिंहासन'मध्ये 'पानिटकर' साकारणाऱ्या जयराम हर्डीकरचा अकाली मृत्यू झाला नसता तर...

गिरीराज पिक्चर्स या बॅनरचा 'सामना' चित्रपट चाळीस वर्षांपूर्वी १८ एप्रिल १९७५ रोजी आला होता. हा राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमी असलेला चित्रपट झळकला आणि राज्यातील सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात प्रचंड खळबळ उडाली. एका ध्येयनिष्ठ मास्तरने (डॉ. श्रीराम लागू) एका सहकारसम्राटाच्या (निळू फुले) अस्तित्वास दिलेले आव्हान या कथासूत्राभोवती हा चित्रपट होता. हा चित्रपट झळकला आणि नंतर २५ जून रोजी देशात आणीबाणी जाहीर झाल्याने या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालून तो चित्रपटगृहातून उतरवण्यात आला. विजय तेंडुलकरांची कथा-पटकथा-संवाद असणाऱ्या या चित्रपटाचे दिग्दर्शनदेखील डॉ. जब्बार पटेल यांचे होते. तर निर्मिते रामदास फुटाणे व माधव गालबोटे हे होते. महाराष्ट्रातील सहकारसम्राटांच्या साम्राज्याशी कोणत्याही माध्यमातून 'सामना' करायला अंगी वेगळी साहसी वृत्ती असायला हवी. दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी ती चित्रपट माध्यमातून दाखवली. एका वादग्रस्त साखरसम्राटाच्या दडपशाहीच्या विरोधात उभ्या राहिलेल्या मास्तरचा 'सामना' त्यांनी अतिशय नाट्यपूर्णरीत्या साकारला. या चित्रपटाने मराठी चित्रपटसृष्टीला एका वेगळ्या वळणावर आणलं.

प्रेम, पुन्हा विवाह, मग पुन्हा काही काळापुरते एकत्र राहणे, पुन्हा एकटेपण, मग मात्र अनेक वर्षांचा दुरावा आणि मग पुनर्मीलन तसेच पुन्हा एकदा एकत्र येण्याची वर्तुळाकार गती असे काही दाखवणारा गुलजार यांचा 'आँधी' नावाचा अप्रतिम चित्रपट. प्रेम, मानवी नाती, सुख-दुःखासारखी तत्त्वे जी गुलजारांच्या चित्रपटांची मुख्य अंगे असतात. मात्र या 'आँधी' चित्रपटात त्या तत्त्वांबरोबरच राजकारणाची पार्श्वभूमीदेखील आहे. हिंदीमधील एक ज्येष्ठ लेखक, पत्रकार कमलेश्वर यांच्या 'काली आंधी' या कादंबरीवर आधारित 'आँधी' हा चित्रपट

होता. या चित्रपटाची नायिका आरती (सुचित्रा सेन) आणि जे.के (संजीव कुमार) यांच्यात घडणारी ही प्रेम आणि नात्यातला गुंता दाखवणारी कथा. हे दोघे प्रेम करतात आणि नंतर लग्न करतात. पण आरतीच्या श्रीमंत राजकारणी पित्याला (रहमान) ते लग्न मान्य नसते. त्यांना आरतीने राजकारणात स्थिर व्हावे असे वाटत असते. त्यामुळे त्यांना आरतीने राजकारणाचे चकचकीत आणि चमकते भविष्य दुर्लक्षित करून सामान्य स्त्रीप्रमाणे घरकुटुंबात पडावे आणि तेही एका साधारण स्तराच्या व्यक्तीबरोबर लग्न करावे असे कदापि वाटत नसते. तरीही लग्न होतेच. पुढे काही दिवसांनी आरती बदलायला लागते. कारण वडिलांमुळे आरती लहानपणापासून राजकीय पार्श्वभूमीच्या वातावरणात वाढलेली असते. त्यामुळे तिला त्या अस्तित्वाची आठवण हळूहळू, मात्र प्रकर्षाने येऊ लागते. मग तिचे वडिलांच्या राजकीय बैठकांना जाणेयेणे वाढते. तिच्या पतीला जे.के. ला हे पसंत नसते. पुढे दोघांतील लहान लहान मतभेद मोठे रूप घेत जातात आणि अखेर एके दिवशी एका गैरसमजाने दोघे वेगळे होतात.

हा चित्रपट पाहताना प्रथम दर्शनी असे वाटते की, हा चित्रपट तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींच्या जीवनाशी साम्य दाखवणारा आहे. कारण या चित्रपटाची नायिका आणि इंदिरा गांधी आपल्या पतीपासून वेगळ्या राहून वडिलांबरोबच अधिक राहतात आणि वडिलांच्या राजकारण या क्षेत्राला आपलेसे करतात. चित्रपटात आरती इलाहाबाद या क्षेत्रातून निवडणूक लढवताना दाखवली आहे आणि प्रत्यक्षात इंदिरा गांधींचे राजकारणाच्या दृष्टीनेसुद्धा इलाहाबाद, फुलपूर आणि रायबरेली ह्या भागाशी नाते राहिले आहे. इतकेच नाहीतर इलाहाबाद हा विभाग एकेकाळी नेहरू परिवाराचे मुख्य राजकीय क्षेत्र मानले गेले होते. हे एवढेच काय ते साम्य नायिकेमध्ये आणि इंदिरा गांधींमध्ये होते. इंदिरा गांधींचे पती फिरोज़ गांधी स्वत: राजकारणी होते आणि खासदारही होते. पण 'आँधी' चित्रपटात आरतीचा पती जे.के ह्याला तर राजकारणाविषयी तिरस्कार आहे आणि तो एका हॉटेलचा मॅनेजर आहे. असेही म्हटले जाते की, कमलेश्वरांची कादंबरी आणि 'आँधी' चित्रपटात इंदिरा गांधी आणि बिहारची प्रसिद्ध राजकारणी तारकेश्वरी सिन्हाच्या राजकीय आणि व्यक्तिगत जीवनातून प्रेरणा घेतली गेली होती. तरीही आणीबाणीच्या काळात संजय गांधीने पुढाकार घेऊन चित्रपट गृहातून हा चित्रपट बंद करायला लावला होता. त्याच्या प्रिंट जाळल्या होत्या. मात्र 'आँधी' ह्या चित्रपटाची कथा राजकीय पार्श्वभूमी असलेली आणि गुलजार यांच्या तरल शैलीतून साकारलेली भावपूर्ण अशी प्रेमकथाच होती. त्यातील सुचित्रा सेन यांचा गेटअप तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्याशी मिळता जुळता होता. पण तशी ही फिल्मी प्रेमकहाणीच होती. फक्त थेट इंदिरा गांधींचा प्रभाव जाणवणारी होती हे तितकेच खरे.

अलीकडे आलेला प्रकाश झा यांच्या 'राजनीती', 'अपहरण' ह्या चित्रपटांच्या निमित्ताने पुन्हा एकदा राजकारणावर चर्चा घडवून आणली. त्यांच्या त्या चित्रपटांचा सगळा 'फोकस' हा प्रामुख्याने बिहारमधील हिंसाचारी राजकारणावर होता. तो त्यांनी प्रभावीपणे मांडला तरी तो मनोरंजनी थाटाचा होता. त्यात हवा तितका गंभीरपणा नव्हता. दलित राजकारण आणि जमीनदारीच्या खुंटाला बांधलेल्या ग्रामीण जनतेच्या शोषणाचे राजकारण या पंचायती प्रपंचाला श्यामबाबू अर्थात श्याम बेनेगल यांनी 'निशांत' आणि 'मंथन' या चित्रपतात दाखवले ते खूप परिणामकारक होते. तशाच परिस्थतीला प्रतिकार करण्याची ताकत दिली ती प्रकाश झाच्या 'दामुल' चित्रपटाने. म्हटलं तर ही राजकीय पार्श्वभूमी असलेल्या भारतीय उत्कृष्ट चित्रपटांची श्रेष्ठ उदाहरण आहेत. भविष्यात राजकीय पार्श्वभूमी असलेले चित्रपट गंभीर रूपात मांडले जातील अशी आशा बाळगायला हरकत नाही.

■

***एक राजकीय नेता निवडणूक लढवून विजयी होतो. आपल्या पाच वर्षाच्या कारकिर्दीत जनतेसाठी एकही चांगले काम न केल्याने त्या विभागातील जनता नाराज होते. पुढच्या निवडणुकीला जो नेता मते मागण्यासाठी घरोघरी जातो, तेव्हा सुजाण नागरिकांनी त्या नेत्यास हे काव्य ऐकविले.***

चोरोंसा चेहरा तेरा डाकूसी मुसकान है
नेता तुझे देखकर, काम तेरे देखकर
बापू भी हैरान है, स्वर्ग में बापू भी है हैरान

बेईमानी करने में, घोटाला करने में तुमसा न् माहीर है,
दलबदल करने में, हेराफेरी करने में कुर्सीका पायदान
ऐसा भी क्या चीज है, टिकता न ईमान हैऽऽ।
नेता तुझे देखकर, काम तेरे देखकर बापू भी हैरान
स्वर्ग में बापू भी हैरान है।

दुसरी काव्यरचना -
अंडे मँगा के रखना, डंडे सजा के रखना
लेने को वोट वापस आयेगा नेता अपना
अंडे मँगा के रखना; डंडे सजा के रखना हो हो

आएगा सर झुकाकर, आदर तुम्हें दिलाकर
माँगेगा वोट अपना; दाता तुम्हें बनाकर
चिठ्ठी थमाए रखना, शीशा दिखाए रखना
अंडे मँगाके रखना, डंडे सजाके रखना... हो हो।

चाल पहिले काव्य
१) फुलोंसा चेहरा तेरा कलियोंसी मुसकान है।

चाल दुसरे काव्य
२) मेहंदी लगा के रखना
सेहरा सजा के रखना
चेहरा छिपा के रखना
लेने तुझे ओ गोरी
आयेगा तेरा सजना

**- आशा मुकुंद आठले**
भ्रमणध्वनी : ९८३३२९१४१३

# राजकारण हे अध्यात्माचेच एक रूप आहे!


**अतुल जोशी**



atuljoshi1173@gmail.com

राजकारण म्हटलं, तर ती अध्यात्माची एक सर्वाधिक सुपीक अशी भूमी आहे. राम व कृष्ण ह्या दोन व्यक्ती जशा राजकारणाच्या शिरोमणी मानल्या जातात, तशाच त्या अध्यात्म तेजाच्या प्रतीकाचं रूप म्हणूनही मानल्या गेल्या आहेत. महाराज जनक प्रजावत्सल आदर्श राजा होऊनही अनासक्त आणि मनाने मुक्तच राहिले. गांधीदेखील त्याच परंपरेचे आधुनिक वाहक आहेत. खरं तर अध्यात्माची उंची आणि उदात्तपणा प्राप्त करण्यासाठी जो प्रवास करावा लागतो, त्यास राजकारण हे एक अत्यंत महत्त्वाचं वाहन आहे.

तरीही राजकारणाबाबत सर्वसाधारण माणसांत अशी धारणा असते की, राजकारणात कायम छळ-कपटाचा प्रपंच, जोड-तोड, खऱ्याचं खोटं करण्याचं कसब, चालाखी-धोकेबाजी, संवेदनहीनता, स्वार्थ व भंपकपणा हेच पायाभूत पर्याय आहेत. तसंच राजकारण हे अपप्रवृत्तींचं पोषण करणारंच असतं. त्यामुळे राजकारणास जवळजवळ धर्म किंवा अध्यात्माच्या विपरीत मानलं गेलं आहे. आध्यात्माचे जिज्ञासु जसे राजकारणास हीन मानून त्याची निंदा करताना थकत नाहीत तसेच समाजातील सामान्य माणसंदेखील राजकारणाची निंदा कायमच करत असतात. जगात जे दुःख, क्षोभ, विषमता, अन्याय, शोषण, अपराध, हिंसा, अराजकता या साऱ्यांसाठी घरात-बाहेर, दुकान-कार्यालयं, रस्ते-मैदाने, स्कूल-कॉलेज, बार आणि पूजागृहात सगळीकडेच माणसं कारणीभूत असतात. त्यामुळे तिथे इतर गोष्टींबरोबरच राजकारणावर चर्चा असते, तशीच निंदादेखील असते. तरीही हे निश्चित आहे की, माणसाच्या जगण्यात राजकारण हा एक महत्त्वाचा भाग आहे, हे मान्यच करावं लागेल. मनोविज्ञान हे मानतं की, निषेधात, नकारात, निंदेत एक निमंत्रण किंवा संबद्धता निहित असते. मग असं मानायचं का की, राजकारण आजच्या आधुनिक मनुष्य जीवनात अनिवार्य आहे.



मग मनात असा विचार येतो की, असं असतानादेखील सर्वत्र निंदेचं माहेर घर असणाऱ्या राजकारणाची अनिवार्यता खरंच आहे का? याबाबत स्वतःलाच जरा अधिक हलवून विचारलं असता, कधी कधी चीड येते व मनाला बोचतंदेखील. त्यामुळे उलट जीवन अधिकंच ढवळून निघतं. कारण तेवढा आपला राजकारणाचा बारकाईने करावा लागणारा अभ्यास नसतो. त्यातून पूरक उत्तर न सापडल्याने; मग सारं जग कटू आणि कडू वाटायला लागून राजकारण त्याज्यच असलं पाहिजे, ही भूमिक अधिक तीव्र होते. पण जगाकडे तोंड फिरवून बसणाऱ्या आणि संन्यास घेण्याची घोषणा करणाऱ्या, कथित संन्यास प्रतिनिधींना डोळे उघडे ठेवून पाहिल्यावर, मात्र लक्षात येतं, हे तर राजकारणापेक्षा वाईट आहे. या दोन्हीत भरपूर विरोधाभास आहे. तरीही असं मानून चाला की, राजकारण हे मनुष्याला सातत्याने लागणाऱ्या हवा, पाण्याइतकं ते जरुरीचं झालं आहे. त्यात लोकशाही शासन प्रणालीच्या वाढत्या स्वीकार्यतेने राजकारणाच्या अनिवार्यतेला पुष्ट केलं आहे. व्यावहारिक जीवनाच्या वाटा आणि रस्ते तर राजकारणाच्या चौपाटीस मिळताना दिसतात. या चौपाटीवर तंटे, भांडणं, संकटं आहेत तशाच समस्यादेखील आहेत, धोके आणि छळवणूकही आहे. ईर्ष्या, कटुता, कलह, विरोध, वैमनस्य, प्रतिस्पर्धा, प्रतिशोध आणि पराजयाची संकटंही आहेत. त्याचबरोबर आगळे रंग आणि रस इथे भरपूर आहेत. हर्ष, उल्हास आणि दिखावा यांचं सर्वाधिक प्रकटीकरण इथेच पाहायला मिळतं. तसंच सेवा, समर्पण, समन्वय, सौजन्य आणि सहयोग यांची पाती लवलवण्यासाठीसुद्धा इथे संधी मिळते. आत्मिक विकासाच्या कसोटीवर स्वतःला निरखणं आणि पारखण्याची शक्यतादेखील इथेच प्राप्त होते. सफलता आणि असफलता यांच्या मध्ये स्वतःचा तोल सांभाळण्यासाठीसुद्धा अनेक टेकू इथेच मिळतात. मान-अपमान यांच्या मध्ये स्वतःला सावरण्याचं शिक्षणदेखील इथेच मिळू शकतं. समृद्धी आणि संयम यांच्या सोबतीने तग धरण्याची आवश्यकता इथे असते. अनासक्ती आणि संवेदनशीलता इथेच पाहायला मिळते. उदारता आणि दृढता

यांचा सारखाच स्वर इथेच पाहायला मिळतो. लढण्याचं आणि भांडण्याचं हे कुरुक्षेत्र आहे. तसंच एकत्र जगण्याचं विविध आयामी चित्र इथेच दिसतं. इथे जीवन आणि जग यांचा कायम स्वीकार केला जातो. पडणं आणि उभं राहणं यांचं इथेच स्वागत होतं. इथे लहान-मोठ्या पावलांचं अभिनंदन केलं जातं. ही राजकारणाची चौपाटी जीवनाच्या रंगमंचाचं एक सर्वाधिक सक्षम प्रमाण आहे. इथे निरंतर अभिनेत्याच्या कौशल्याचं कौतुकच असतं. सतत परीक्षा इथेच होते. क्षणांच्या वेगात निर्मित होणाऱ्या व छाया-प्रकाशासारख्या बदलणाऱ्या यश-वैभवाच्या विराट सावल्या इथेच दिसू शकतात. ही राजकारणाची चौपाटी तुम्हाला कायम आकर्षित करते, मोहित करते, आनंदीदेखील करते. प्रत्येक क्षणी स्वतःला अनुकूल आणि प्रतिकूल यांचे अथांग अनुभव घेण्यासाठी जागरूक राहण्याच्या संधी इथेच मिळू शकतात. इथे निद्रेत आकंठ बुडण्याची, अय्याशी करण्याची संधी जितक्या वेळा मिळते, तितक्याच वेळा जागं राहून डोळ्यात तेल घालून जीवन आणि जगाच्या तारतम्याला न्याहाळण्याची संधीदेखील मिळते. ही एक अस्त-व्यस्त, अव्यवस्थित, आक्रमक, अस्थिर, रोचक, मादक, मोहक, उत्तेजक प्रतीत होणारी एक रंगशाळा आहे. इथे पद आणि प्रतिष्ठेच्या मायावी जगामागे धावण्याची अंतहीन शृंखला कायम असते. इथे तुम्हाला प्राप्त झालेला जय जगण्यापेक्षाही मोठा वाटत राहतो आणि पराजय मृत्यूपेक्षाही कष्टप्रद वाटत राहतो. दुरून पाहताना ही राजकारणाची चौपाटी सुंदर, सक्रिय आणि उत्साहपूर्ण अशी वाटते, पण जवळ जाऊन बारकाईने पाहिल्यावर लक्षात येतं की, इथली प्रत्येक व्यक्ती निर्मनुष्य वाळवंटात तहानलेल्या पथिकाप्रमाणे मरीचाच्या मागे धावताना दिसते.

अध्यात्म काय आहे? सत्याला पाहणं आणि जाणणं. सत्य काय आहे, कुठे आहे? सत्य सर्वत्र आहे, सार्वभौम आहे. जगाला तुकड्या तुकड्याने पाहणं माया आहे आणि अखंड पाहणं सत्य आहे. असीमित आणि अनंत यांच्या रहस्याला जाणणं व जगणं हीच तर आध्यात्मिकता आहे. मग राजकारणाचा त्याला विरोध कुठे आहे? राजकारण म्हटलं, तर ती अध्यात्माची एक सर्वाधिक सुपीक भूमी आहे. एकूणच संसाराचा भरपूर अनुभव देणं, अध्यात्माचा पाया आहे. पाण्याची हालचाल आणि दलदलीचा अस्थिर आधार कमलपुष्पाला फुलवण्यास मदतच करतो. तसंच राजकारण हा मोठा संसार आहे, त्याचं पाणी प्रवाही आहे, त्यात दलदलदेखील आहे, त्यात तुम्हाला अध्यात्माचं कमळ फुलवण्यासाठी तीच तर खरी उपयुक्त भूमी आहे. खंड खंडांच्या पलीकडे अखंड भूमी आहे. अनेक सीमांच्या पलीकडे दृष्टी पोहोचू शकणार नाही इतकी ती आहे. क्षुद्र जगण्याकडून विराट, विशाल जगण्याकडे जाण्यासाठी राजकारणाच्या चौपाटीवर मोकळा श्वास घेण्यास उपयुक्त असं वायुमंडल आहे. पद, प्रतिष्ठा यांच्या भुकेस सत्याच्या भुकेकडे वळवणं कोणतं कठीण काम आहे? व्यक्तीत समर्थक शोधण्याचा प्रयत्न करणं, म्हणजेच व्यक्तीत ईश्वर शोधण्याच्या रस्त्याचा तो एक थांबा आहे. जिंकण्याच्या आणि हरण्याच्या विस्मयकारक स्थितीत कर्तेपणाची जाणीव आणि अहंच्या ज्वालेत जळण्यापेक्षा, स्वतःला निमित्त मानण्याची समज येणं कठीण नाही. प्रयत्न आणि परिणामाचं गणित सरळ नाही. उलट प्रत्येक प्रयत्नानंतर मिळणाऱ्या संतुष्टतेचा तो एक स्रोत आहे आणि परिणाम एका रंगीत बुडबुड्याप्रमाणे प्रगट होऊन, परत प्रयत्नांच्या प्रवाहात मिसळून जातो. हे म्हटलं तर, आध्यात्मिक सत्य राजकारणाच्या कर्मभूमीकडूनच जन्म घेतं. मित्र आणि शत्रू काळ बदलण्याच्या दोन स्थितींप्रमाणे आहेत. व्यक्तीची प्रकृती आणि प्रवृत्ती काळानुसार बदलते. अशात व्यक्तीला दोष देणं किंवा श्रेय देणं म्हणजे तो केवळ एक अभिनय असतो; ते वास्तव नसतं. काळाच्या परिवर्तनशील चक्रास पाहणं आणि होणाऱ्या बदलास काळाच्या सोबतीने जाणणं, एक आध्यात्मिक बोधाचा उन्मेष पाहण्यासारखं आहे आणि राजकारण हे त्या बोधाचं कृषिक्षेत्र आहे.

अनुभवाचा उत्कर्ष हाच मुक्तिपथाचा प्रारंभ आहे व राजकारण अनुभवशीलता प्राप्त करण्याचं शिखर आहे. अनुभवाच्या या सर्वोच्च पथावरच अंतिम सत्याची गाज ऐकण्याची संधी तुम्हाला प्राप्त होऊ शकते. काळ्याकुट्ट रात्रीनंतर सूर्योदय होणं अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे राजकारणात आकंठ बुडलेल्या माणसाचं मुक्त होणं आवश्यकच असतं. परमभक्ती आणि परममुक्ती एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मग वर्तमान स्थितीत एक राजकारणी व्यक्ती, आध्यात्मिक व्यक्ती होताना का दिसत नाही? कदाचित याची दोन कारणं आहेत- पहिलं, राजकारणाच्या प्रबळ प्रवाहात ते निरंतर स्वतःला वाचवत असतात, त्यांचं राजकारणात खरोखरचं बुडणं होतच नाही, तर ते जवळजवळ आपण त्या प्रवाहाने चिंब झालो आहोत असं भासवत राजकारणात स्थिर होण्यासाठी धडपडतात. दुसरं, ते आपल्या अनुभवांना डोळसपणे पाहत



**मकरसंक्रांत - हळदीकुंकू**

शुक्रवार दि. २९ जानेवारी २०१६ रोजी
मकरसंक्रांतीचे हळदीकुंकू आयोजित केले आहे.
तरी सर्व महिलांना आग्रहाचे आमंत्रण.

**वेळ** : सायंकाळी ६ ते ८

**स्थळ** : ब्राह्मण सेवा मंडळाचे तळमजल्यावरील सभागृह

जगत नाहीत. अनुभवांना आणि वैयक्तिक विचित्र स्वभावास काळानुसार जाणण्यास, समजण्यास सजग होत नाहीत, तर तत्कालीन गोष्टीत फसत राहतात. तसंच स्वतःप्रती जागण्याचा प्रयत्न करत नाहीत. जर राजकारणी व्यक्ती पूर्णपणे राजकारणात उतरली; सघन संपर्क, सहज संवाद, विस्तार आणि विकास यांची उकल करणारी व्यक्ती असं तिचं प्रतीक होऊन ती सक्रिय राहिली, तसंच छोटे-मोठे, कडू-गोड तसेच अनेक अनुभवांना आणि स्थितींना व्यक्तींच्या संदर्भात समजण्या ऐवजी, त्यांना काळाच्या संदर्भात जाणण्याच्या जागृत भूमिकेत राहिली तर, राजकारण तिच्यासाठी एक साधनेचं स्थळ होऊ शकतं. आणि ती माणूसकीसाठी अभिशाप किंवा विडंबन होण्याऐवजी समस्त जगाच्या त्रासास मुक्ती देणारी तारणहार होऊन मोठी होऊ शकते.

राजकारण जीवनाची धुरा आहे. निंदेने ती धुरा बदलणार नाही. या धुरेचा उपयोग या संसार-चक्रासाठी होतो आहे; होत राहिला पाहिजे, आणि तेच गरजेचं आहे. परंतु या धुरेवर फिरणाऱ्या चक्रास पाहून जर दृष्टीची सीमा तुटली, डोळे पूर्ण उघडले व असं वाटू लागलं की, तुकड्या-तुकड्यात वाटल्या जाण्याच्या नियतीपासून आपली सुटका झाली आहे, तर मग व्यष्टीचे समष्टीत आणि समष्टीचे परमेष्टीत रूपांतर होण्यास वेळ लागत नाही. महाभारतास ज्या माणसांनी त्यातील पक्ष-विपक्षास तात्कालिक सीमित दृष्टीने पाहिलं; ते समज आणि गैरसमजाने मृत्यूस पात्र ठरले. परंतु त्या अत्यंत भयावह वाटणाऱ्या पृष्ठभूमीवरच कृष्ण नावाच्या चेतनेने अखंड दृष्टी ठेवून माणूसकीचं जे आवाहन केलं, तेच आव्हान पुढे भगवत्‌गीता होऊन, युगानुयुगाचं मुक्तिगान करत, अमरत्वाच्या प्रकाशाचं आपल्याला विलोभनीय दर्शन घडवत राहिलं.

झेन साधक मानतात, दृष्टी हीच मुक्ती आहे. तर राजकारणाच्या संसारास, अनुभवाच्या, प्रयोगाच्या, कर्माच्या मुक्तीची रंगशाळा म्हणून पाहणं म्हणजे मुक्तीच्या मार्गावर पाऊल ठेवण्यासारखं आहे. दुर्दैव हे आहे की, मोठा काळ लोटला तरी अजून राजकारणाची आध्यात्मिक सुपीक, संपन्न भूमी ओसाड असिंचितच राहिली. अशातही तिचा तत्परतेने रुजणाऱ्या बिजांचा शोध कायम आहे. मात्र आपल्याजवळ तिच्याकडे पाहण्याची सकारात्मक डोळस वृत्ती नसल्यामुळे ती जमीन ओसाड, नापीक होत चालली आहे. आणि तिथे साचत आहेत नुसते बिनकामाचे दगड. त्यात रुजण्यास उत्सुक बीजं आकसून कडक झाली आहेत. या भूमीस नव्या, ताज्या दमाच्या बीजांची कायम आशा आहे की, निदान आता तरी पाऊस पडेल आणि ताज्या दमाची बीजं स्वतः रुजून, त्यांना पालवी येईल. आणि या जमिनीला पुन्हा सुपीकता प्राप्त होईल. आणि अनावश्यक दगड-धोंड्यांनी भरलेली ही जमीन हिरव्या कुरणांनी लहरेल. शिवाय सृष्टीस क्षुधादग्ध अवस्थेपासून मुक्ती देईल. ■


# ब्राह्मण सेवा मंडळ

**भवानी शंकर मार्ग, दादर, मुंबई-४०००२८**

## संक्रमण महोत्सव : २०१६

दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. ४ फेब्रुवारी २०१६ ते ८ फेब्रुवारी २०१६ या दरम्यान संक्रमण महोत्सव व्याख्यानमाला आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे ही विनंती.

| दिनांक/वार | वेळ | वक्ते/सहभाग | विषय |
|---|---|---|---|
| ४-२-२०१६ गुरुवार | संध्या. ७वा | **श्री. गिरीश प्रभुणे** (संस्थापक-समरसता गुरुकुलम/भटक्या विमुक्त जमातीसाठी कार्य. चतुरंग प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त) | **''भारतीय संस्कृतीमधील वंचितांचे स्थान''** |
| ५-२-२०१६ शुक्रवार | संध्या. ७वा | **श्रीमती सुहास जोशी** (सुप्रसिद्ध अभिनेत्री) | **''नाट्यचित्रपटातील प्रवास''** |
| ६-२-२०१६ शनिवार | संध्या.७वा | **श्रीमती अरुणा ढेरे** (कवियत्री व साहित्यिक) | **''देवांचे संसार''** |
| ७-२-२०१६ रविवार | संध्या. ७वा | **श्रीमती रेखा दिवेकर** (लेखिका व प्राध्यापिका) | **''चिरतारुण्याचा आरसा''** |
| ८-२-२०१६ सोमवार | संध्या. ७वा | **श्री. अरुण टिकेकर** (ज्येष्ठ पत्रकार) | |

# पिंगा ग पोरी पिंगा

**सुरेश (रा. त्रिं. बर्वे)**

दूरध्वनी : २४४४९४१३
rtbarve@rediffmail.com

स्त्रीयस् चरितम् । पुरुषस्य भाग्यम् । देवो न जानाति । कुतो मनुष्यः। ह्या संस्कृत काव्यपंक्ती साधारणपणे स्त्रियांच्या चारित्र्याची कुचेष्टा करण्यासाठी पुरुषवर्ग वापरतो. मात्र १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धात एका स्त्रीने ह्याला सडेतोड उत्तर दिले, तेसुद्धा पिंगा घालून व भल्याभल्यांना आपल्याभोवती पिंगा घालायला लावूनच. पुरुषस्य भाग्यम् ह्या काव्यपंक्तीनुसार ती एका पुरुषाची भाग्यच बनली. कारण समोरचा पुरुष तसाच बलदंड होता. तो पुरुष म्हणजे पहिला स्वातंत्र्यसैनिक १८५७ चा सरसेनापती अर्थात तात्या टोपे.

१८१४ मध्ये जन्मलेले रामचंद्र पांडुरंग टोपे ऊर्फ तात्या टोपे हे इंग्रजांविरुद्ध कडवी झुंज देणारे, स्वातंत्र्यसंग्रामाची सुरुवात करून देणारे तसेच इंग्रजांच्या ताब्यात असणारे कानपूर जिंकून इंग्रजांच्या उरात धडकी भरवणारे नानासाहेबांचे सरसेनापती म्हणून आपल्याला परिचित आहेत. शिवाय कानपूर जिंकल्यावर खालेर बुंदेलखंडातून लढाई चालू ठेवणारे व झाशीच्या राणीला मदत पुरवणारे तात्या टोपेदेखील आपण जाणतोच. तसेच दुर्दैवाने मानसिंग ह्या आपल्या मित्राच्या फितुरीला व दगाबाजीला बळी पडून पकडले गेलेले व हसत हसत स्वातंत्र्यासाठी फाशी जाणारे (१८ एप्रिल १८५९ रोजी) तात्या टोपेंसुद्धा आपण ओळखतो. आपल्याला फक्त माहीत नाही ते त्यांचे हेरगिरीतले प्रावीण्य व दूरदर्शीत्व. कोणत्याही युद्धात आणि शांततेतसुद्धा हेरगिरीला महत्त्व असते.



Veerangana Ajijan
वीरांगना अजीजन

जगाच्या इतिहासात तरुणांबरोबरच अनेक तरुणींनीदेखील आपापल्या देशासाठी हेरगिरी करून देशाला मोलाची मदत केलेली आहे. उदाहरणच द्यायचे झाले, तर पहिल्या महायुद्धात (१९१४-१९१८) गाजलेली सुप्रसिद्ध जर्मन सौंदर्यवती आणि नर्तिका माता हारी हिचे देता येईल. तिने पहिल्या महायुद्धात केलेल्या हेरगिरीच्या कथा आपण आदराने वाचतो. मात्र पहिल्या महायुद्धाच्या साठ वर्षं आधी भारतात देशासाठी हेरगिरी करणारी व त्यासाठी शिस्तबद्ध सैनिकी शिक्षण घेतलेल्या अनेक नर्तिकांची एक तुकडीच 'पिंगा ब्रिगेड ऊर्फ मस्तानी टोळी' या नावाने निर्माण करून, तात्या टोप्यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजांना आपल्या मोहजालात अडकवण्याचे अतीव मोलाचे कार्य करणारी कानपूरची सौंदर्यवती अजीजनबाई आपणा कोणासही ज्ञात नाही, म्हणून हा लेखप्रपंच!

आपल्या पराक्रमावर, नेतृत्वावर व स्वातंत्र्याच्या कल्पनेने आपल्या झपाटलेपणातून होत असलेल्या कामगिरीवर अजीजनबाई ही नृत्यांगना लुब्ध झाली आहे, हे तात्यांच्या ध्यानात यायला फार काळ लागला नाही. पण कोणत्याही क्षणिक मोहाला बळी न पडता तात्यांनी ह्या अतीव सौंदर्यवती नृत्यांगनेचे नेमके छुपे सामर्थ्य वेळीच ओळखले. मग तात्यांनी तिला एक अशी शपथ घ्यायला लावली की, 'मी स्वातंत्र्ययुद्धासाठी हेरगिरी करत उरलेले आयुष्य व्यतीत करेन व त्यासाठी वेळ पडल्यास मृत्यूलासुद्धा कवटाळेन' त्यानंतरच त्यांनी तिला क्रांतिकारी पार्टीची सभासद करून घेतले. शिवाय तिच्यावर स्त्री-नर्तिकांच्या प्रभावी गुप्तहेर यंत्रणेची जबाबदारीदेखील सोपवली. जेणेकरून ती असंख्य इंग्रज अधिकाऱ्यांना त्या नर्तिकांच्या मोहात गुंतवून सर्व गुप्त माहिती वेळोवेळी तात्या, नानासाहेब किंवा नबाब शमसुद्दीन ह्यांच्याकडे शिताफीने पोहोचवू शकेल.

अजीजनबाईने ही कामगिरी इतक्या कौशल्याने केली की, लवकरच तिचा क्रांतिकारी पार्टीच्या अंतर्गत वर्तुळात समावेश करण्यात आला. त्यानंतर मग स्वातंत्र्यसमराच्या अनेक गोपनीय वाटचालींविषयी तिच्याशी अत्यंत विश्वासाने चर्चा होऊ लागली.

अजीजनबाईच्या कोठीवर अनेक इंग्रज मुलकी अधिकारी, इंग्रज सेनाधिकारी व इंग्रज सैनिक नर्तिकांच्या नृत्यकलेवर फिदा होऊन त्यांचे नृत्य पहाण्यास नित्यनियमाने येत व अलगद कधी अजीजनबाईच्या जाळ्यात अडकले जात, हे त्यांचे त्यांनाच समजत नसे. मग काय हव्या असणाऱ्या गुप्त माहितीच्या खजिन्याची किल्लीच अजीजनबाईच्या हाती असायची. बाईने तो खजिना राष्ट्रनिष्ठेने नित्यनियमाने लुटला आणि तात्या, नानासाहेब किंवा नबाब शमसुद्दीन ह्यांच्या पुढ्यात रिता केला. 'पिंगा ब्रिगेड ऊर्फ मस्तानी टोळी'ला अर्थात सौंदर्यवती नर्तिकांना सैनिकी व हत्यारे चालविण्याचे प्रशिक्षण मिळाले ते नबाब शमसुद्दीन ह्यांच्याकडून. मस्तानी टोळीच्या अस्त्राचा वापर करून नको असणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांचा काटा इतक्या सफाईने

काढला गेला की, त्याची खबरसुद्धा इंग्रजांना लागणे जवळ जवळ अशक्य बनले होते. अशा रीतीने ह्या सौंदर्यवती नर्तिकांच्या तुकडीने त्यांना दिलेले 'मस्तानी टोळी' हे नाव सार्थ ठरवले.

नानासाहेबांनी जेव्हा कानपूर जिंकून घेतले, तेव्हा कानपूरमध्ये सापडलेल्या इंग्रजांच्या बायका-मुलांना त्रास होऊ नये, म्हणून त्यांना अजीजनबाईच्या ताब्यात देण्यात आले. अजीजनबाईच्या 'बिबीघर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वास्तूमध्ये जवळ जवळ अडीचशे-तीनशे इंग्रज बायका व मुले होती. त्यांना बाईने छान सांभाळले खरे, पण त्यांच्यावरही गुप्तपणे लक्ष ठेवून अजीजनबाईने बरीच महत्त्वाची माहिती मिळवली. मग ती माहिती क्रांतिकारकांच्या हाती सुपूर्द केली. असेच गुप्त निरीक्षण चालू असताना काही इंग्रज महिला काही देशद्रोह्यांशी संधान बांधून इकडच्या बातम्या तिकडे इंग्रजांकडे पोहचवत आहेत, हे कळल्याबरोबर अजीजनबाईने संबंधित महिलांचा मोठ्या शिताफीने सफाया करून ते विषकेंद्रच मुळापासून नष्ट केले.

पण दुर्दैवाने काही काळाने बाजी पलटली. इंग्रजांनी आपली सर्व शक्ती एकवटून कानपूरवर जोरदार हल्ला चढवला. तात्यांनी अतुलनीय धैर्य दाखवून पराक्रमाची शर्थ केली. अजीजनबाई साथीला होतीच. कानपूर पडणार हे लक्षात येताच तात्यांनी निसटून जाणे आवश्यक आहे, हे साऱ्यांच्या लक्षात आले. मग अजीजनबाईने तात्यांना वाचवण्यासाठी स्वत: तात्या टोपेंचा वेष धारण करून इंग्रजांना तोंड दिले व तात्यांना निसटून जाण्याची संधी निर्माण करून दिली. ह्या घनघोर लढाईत मस्तानी टोळीच्या जवळ जवळ सर्व नृत्यांगना शहीद झाल्या. कानपूर जिंकले पण तात्या टोपे निसटले, हे पाहून इंग्रज इतके चिडले की, त्यांनी अजीजनबाई व तिची साथीदार गुलाबो ह्यांची घरेच जाळून टाकली. त्या दरम्यान अजीजनबाई भूमिगत झाली होती. पण दुर्दैवाने त्याच वेळी रणांगणावर शमसुद्दीन शहीद झाला होता. तेव्हा त्याला श्रद्धांजली वाहण्यास आलेल्या अजीजनबाईला इंग्रजांनी सापळ्यात पकडले. १८५७ च्या जुलै महिन्यात इंग्रजांनी दवंडी पिटून लोकांना जमवले व अजीजनबाईवर खटला चालविण्याचे नाटक दोन-चार तास चालवले व त्या खटल्यात आपली बाजू ताठ मानेने बेडरपणे मांडणाऱ्या अजीजनबाईला लगेचच भर चौकात फाशी देण्यात आले. ही सौंदर्यवती नृत्यांगना वीरांगना होऊन त्या शिक्षेला ताठ मानेने सामोरी गेली. तिने तात्या टोपेंना दिलेले 'मृत्यूलाही हसत हसत कवटाळेन' हे वचन पूर्ण केले.

तात्या टोपेंना ब्रह्मभूषण म्हणताना ब्राह्मण स्त्रियांनासुध्दा शक्य नसलेले हेरगिरीचे काम सहज हाताळून स्वातंत्र्ययुद्धाला मोलाची मदत करणाऱ्या अजीजनबाईला आपण कोणता सन्मान देणार आहोत?

■

## शांतीयाग - क्षणचित्रे












# whatsapp वारी

## सौ. स्वाती देवधर

रात्री GN हा मेसेज वाचून मोबाईल बंद केला. दुसऱ्या दिवशी सकाळी मोबाईल चालू केला आणि माझी whatsapp वारी चालू झाली. बॅटरी नोटिफिकेशनमध्ये ४०% दिसले म्हणून चार्जिंगला लावला. Alert tone वाजू लागला.

माझ्या ह्या वारीत २५ ग्रूप आणि जेवढे Contacts आहेत तेवढे वारकरी सामील होते. प्रत्येकाचा मूड वेगळा मात्र येणारा संदेश एकच 'शुभ सकाळ', 'गुड मॉर्निंग', विविध रंगीत फुले, पक्षी, झाडे, पाने, नक्षी, देव आणि बरंच काही ! इतकं सुंदर! चहाचे विविध रंगी विविध कप, कॉफीचे मग्ज, केक्स ह्यांचे incoming गुड मॉर्निंगबरोबर चालूच. त्या दिवसाचे महत्त्व सांगणारे msg चे inward/outward चालू झाले. जसे की, दसरा सणाला लहानपणी पाटीवर काढलेली एकची सरस्वती आणि मोरूचा बाप मोरूला म्हणाला, 'सकाळ झाली. मोरू उठला. मोरूचा बाप मोरूला म्हणाला, 'आज दसरा!' किंवा 'आला आहे दसरा प्रॉब्लेम सारे विसरा, विचार करू नका दुसरा, चेहरा ठेवा नेहमी हसरा' यासारखी यमके फिरू लागली. कोजागिरीला आटीव दूध सकाळीच वारीत मिळाले. नंतर अचानक कुठल्यातरी ग्रूपचे, contact चे dp बदलल्याचे लक्षात आले. वारीतल्या वारकऱ्यांचे वाढदिवस notify होऊ लागले. शाळेतल्या जुन्या मित्रमैत्रिणींचे वाढदिवस virtually गोळ्या, केक्स, return gifts ने साजरे झाले. नवीन कपड्यातले फोटोज कोलाज करून पोस्ट झाले. ह्या अपेक्षेने की सगळ्यांनी कौतुक करावे. मग कौतुक सोहळे पार पडले आणि मग आठवण झाली ती दिवस चालू झाल्याची. पटकन post टाकली गेली, chalo time to be "on time" for the day. see you all later.



मात्र on line यायला on time असणे फार महत्त्वाचे. कारण आपला msg post व्हायच्या आधीच कोणीतरी post करतो. त्याच्यावर झालेली स्तुतिसुमने वाचून डोळे दुखायला लागतात. off line व्हायला वेळ लागत नाही. ऑफिसमधले पहिले काम निपटल्यावर एखादी senti मित्रमैत्रिणीची पोस्ट दाखल होते.

*''मैं यादों का किस्सा खोलूँ तो*
*कुछ दोस्त बहुत याद आते है*
*सबकी ज़िंदगी बदल गयी*
*एक नये सिरे मे ढल गयी*
*कभी किसी की याद बहुत*
*तडपती है और कभी यादों के*
*सहारे ज़िंदगी कटती है*
*जी लो उन पलों को हंस के*
*ऐ दोस्त फिर लौट के दोस्ती*
*के जमाने नही आते'*

घरातल्या मंडळींचा ग्रूप कुटुंब, फॅमिली अशा कितीतरी नावाने वारीत असतो. वारीत पटकन त्यावरून पोस्ट येते, 'आज मी डबा विसरलो', 'संध्याकाळी उशीर होईल', 'डॉक्टरची appointment घेतली का?' 'Book my show वरून रविवारची tickets बुक केली का', 'उद्या अमुक एक जेवायला येणार आहे Zomato वरून हॉटेल्स बघून ठेव. अशा अगणित न संपणाऱ्या post धडकतात आणि वारीत उगीचच कुटुंबाला सामील केले असे वाटायला लागते. तेवढेच कमी म्हणून की काय कामवाल्या बाईचा whatsapp वर msg येतो 'मी दोन दिवस येणार नाही' तेव्हा तर ही संपूर्ण वारी सोडून जावेसे वाटते, पण क्षणभरच! कारण नंतर वारी जोमाने पुढे चालते. दुपारच्या जेवणाला चवींचा जिव्हाळा वाचायला मिळाला. लेकाला तूप, मेतकूट, भात त्याच्या आवडत्या प्लेटमध्ये कालवल्यावर आजीने पाठविलेले लिंबाचे लोणचे वाढले. डोळे मिटून आहा ऽऽ... मीच तृप्त झाले. या अशा आणि इतर अजून अनेक न संपणाऱ्या चवी... जिभेवर आणि पोटावर प्रेम करणाऱ्या साध्या साध्या मात्र मनात कायम असणाऱ्या जिव्हा स्मृती share झाल्या आणि वारी सोडायचा मनसुबा कधीच मागे पडला. जणू पोट भरले आणि वारी पुढे सरकली. दुपारच्या वेळी वारीत सामील झालेले वारकरी विनोद, काव्य, ज्ञान, उपदेश ह्यांचे भांडार खुले करत होते. 'नवरा सुधारायची सोपी आयडिया' आणि मग खूप मोठी गॅप! 'लागल्या लगेच वाचायला! चाळिशी आली गं बायांनो! काम करा, स्वयंपाक करा, मुलांचा अभ्यास घ्या, संसारात लक्ष द्या. असा नवरा सुधारत नसतो.' किंवा welding and wedding मधला फरक– जसे की welding मध्ये आधी ठिणगी आणि मग जोडणी wedding मध्ये आधी जोडणी

आणि मग ठिणगी किंवा you are requested to forward this msg to minimum 20 people on your contact list and in turn ask each of them to do like wise, In three days, most people in India will have this m.s.g. This is one idea that really should be passed around.

किंवा संस्कृतला ज्ञानभाषा म्हणतात म्हणून post केलेला श्लोक :

*तं भूसुतामुक्तिमुदारहासं वन्दे यतो भव्यभवं भव्यभतोयदेव संहारदामुक्तिमुतासुभूतं*

मस्त videoes, कुमार गंधर्व, राम मराठे, लता मंगेशकर, गीता दत्त यांचा स्वर, जो मराठीत जी. एन. जोशी ह्यांनी स्वरबद्ध केला. वसंत बापटांचे गीत, बंगाली स्वर, 'जा सांग लक्ष्मणा सांग रामराजाला समजला म्हणावे न्याय तुझा सीतेला' अशी सगळीकडे मुक्त संचार असलेली वारी.

मनाची अस्वस्थता क्षणात नाहीशी करणारी whatsappवारी अशीच चालत राहते आणि ती GN msg फिरू लागले की, परत दुसऱ्या दिवशी जोमाने चालू लागते.

असाच एक दिवस<br>
मनासारखा पार पडला<br>
जरा कुठे टेकते तोच<br>
देव उभा राहिला<br>
म्हणाला, केव्हापासून लक्ष आहे<br>
तुझ्यावर फार मेहनत घेतेस ह्या whatsapp वारीवर.<br>
आशीर्वाद देता अखंड चालू राहील ही whatsapp वारी.

■

## सामुदायिक व्रतबंध

दरवर्षीप्रमाणे यंदाही<br>
गुरुवार दि. २८ एप्रिल २०१६ रोजी<br>
सामुदायिक व्रतबंधाचे आयोजन केले आहे.<br>
अधिक माहितीसाठी<br>
मंडळाच्या कार्यालयात संपर्क साधा.

## उदकशांत - क्षणचित्रे





## चक्रसंगीत - क्षणचित्रे








# ढेपेवाडा - मराठमोळ्या आनंदाची ठेव

**डॉ. सौ. कौमुदी साने**

अगदी परवाच अचानक एका सुंदरशा ठिकाणी जाण्याचा योग आला. 'ढेपेवाडा-गिरीवन' हे त्या सुंदर ठिकाणाचे नाव. पुण्यापासून तासभर अंतरावर निसर्गाच्या कुशीत पौंड-मुळशी गावालगत 'गिरीवन' म्हणून एक हिरवा, निसर्गाच्या सान्निध्यात असलेला जुना प्रोजेक्ट आहे. पुणे व मुंबईतील अनेकांची फार्म हाऊसेस, टुमदार, नेत्रसुखद असे ऐसपैस बंगले, त्या भोवतालची ऐसपैस जागा असे फारच अप्रतिम लोकेशन. तिथेच 'ढेपेवाडा' ही विलोभनीय सांस्कृतिक वारसा जतन करणारी आणि आपल्याला आज त्या संस्कृतीचा भरपूर आनंद देऊन त्यात सामावून घेणारी, वास्तू मोठ्या दिमाखात आपले स्वागत करण्यास सज्ज आहे.



फडफडता उंच भगवा झेंडा रोवलेले महाद्वार जणू वाड्याची शान आणि संस्कृतीचे मुखदर्शन घडवणारे... डौलाने स्वागत करणारे... आणि दारावर असलेल्या व्यक्तीही तितक्याच विनम्रतेने, हसतमुखाने 'या' म्हणणाऱ्या!

ह्या स्वागताने सुखावून औत्सुक्याने आत प्रवेश करताच मधोमध प्रशस्त चौक आणि त्याच्या बाजूला नेटकेपणाने, सुबकपणे बांधलेला दुमजली वाडा. लाकडी-दगडी. ऐसपैस! ओटी, माजघर, मुदपाकखाना, दिवाणखाना, बिछायत आणि लाकडी पलंग असलेली विश्रामगृहे. हिंदुस्थानी संगीतातील सुंदर रागांची सुंदर नावे त्या वाड्याच्या सौंदर्यात मोलाची भर टाकतात. सौंदर्य खुलवतात. मूड क्रिएट करतात. वेगवेगळ्या दालनांतील लाकडी महिरपींनी नटलेल्या खिडक्या, दरवाजे, स्वच्छ सुशोभित वाड्याला साजेशी सजावट, बाहेरचा खेळता वारा व आणि निसर्ग ह्या मोकळ्या वाड्यात आपण अनुभवतो.

ओटीवर टांगलेल्या मोठ्या झोपाळ्यावर बसून झुलताना पावसाची अचानक एक सुंदर सर आली. समोरच्या चौकात पडणारी 'थेंब बावरी नक्षी' अनुभवताना खूप छान वाटलं... हळू आवाजातील सुरेल जुनी मराठी गाणी ऐकताना, जणू ह्या वाड्यात आपलं भावविश्व उलडतात आणि आपलं तिथे असणं अजूनच सार्थ करतात!

छान सुबक पायऱ्या चढून वरच्या मजल्यावर गेल्यावर ज्याला हल्लीच्या भाषेत Banquet hall म्हणतात अशी मोठी बैठक... आजूबाजूला गाद्या, तक्के आणि मधोमध महिरपींनी सजलेले शेज...!

एखादी सुंदर गाण्याची मैफल, नृत्याविष्कार इथे इतके सुंदर रंगतील... एखादे छोटेखानी शुभकार्य इथे खूप छान सिद्धिस जाईल. त्यानंतर त्यावर टेरेस-गच्ची! जिथून सारं गाव, समोरचे किल्ले ह्यांचे विहंगम दृश्य आपण अनुभवतो. पुन्हा खाली उतरून मागच्या बाजूला असलेली dormety. जिथे एकत्र वीस पलंग




आहेत. तिथे आपण पूर्ण रात्र गप्पा-गाण्यात घालवू शकतो. तिथे जाताना वाटेत बांधलेली विहीर आपल्याला आत डोकावून पाहायला लावेल अशीच सुबक आहे. अनेक फुलझाडांची नावे असलेले रस्ते, पाऊलवाटा ह्या वाड्याभोवतालची मजा वाढवतात. बहावा, बकूळ, पारिजात, मोगरा, गुलाब... किती किती सांगू... ह्या हिरव्या पाचूच्या बेटात हळदीच्या उन्हाची तिरीप अनुभवताना मन फुलपाखरू झाले नाही तरच नवल!

मराठमोळ्या संस्कृतीला साजेसा मराठमोळा स्वयंपाक हीसुद्धा इथली एक खासियत! लाकडी टेबल खुर्च्या असलेला, लख्ख उजेड-वारा असलेला एक हॉल... मराठमोळ्या पदार्थांची रेलचेल असलेले आकर्षक वाढलेले पान (ताट)... आनंदयात्रींच्या आनंदात भर घालणारा हा थाट...

ज्याचा आवर्जून उल्लेख करणे गरजेचे आहे ते म्हणजे तिथल्या कर्मचाऱ्यांची उत्तम सेवा... त्यांचे आपुलकीने वागणे! किती आणि काय लिहायचं? खरंच एक अविस्मरणीय, उत्कट, नेत्रसुखद आणि खराखुरा सांस्कृतिक आनंद देणारी, आपल्याला त्यात सामावून घेणारी अशी ही वास्तू...

आवर्जून भेट द्यावी अशी... ओढ लावणारी... ■


लहान मुले/मुली आणि बाळांसाठी : बारसे, उष्टावण, जावळ, वाढदिवस, मुंज
वधू आणि वर यांसाठी : लग्न, साखरपुडा
ज्येष्ठ नागरिकांसाठी : साठीशांत, पंच्याहत्तरी, ऐंशी वर्षाची शांत
इतर पूजा आणि शांती : सत्यनारायण, उदकशांती, वास्तुशांती, सहस्त्रावर्तन, लघुरुद्र
OPANDIT™
SHUBHAM BHAVATU
Think of a Dharmic Vidhi, Think of oPandit !
संपूर्ण सामग्रीसहित
Mumbai & Suburbs + Thane
+91-9167968204
mrudula.barve@oPandit.com
www.oPandit.com
श्राद्ध विधी : हिरण्य श्राद्ध, सपिंडक श्राद्ध, अंत्येष्टि विधी

## वर्धापन दिन सोहळा



ब्राह्मण सेवा मंडळाचे संस्थापक
नीलकंठ विष्णू कोल्हटकर



दीपप्रज्वलन करताना मंडळाचे विश्वस्त, श्री. हिमांशु काणे
सोबत विश्वस्त, श्री. विनायक लेले, उपाध्यक्ष संतोष वैद्य



श्री. विनायक लेले, विश्वस्त
मार्गदर्शन करताना

## उदक शांत



श्री. सतीश विद्वांस, कोषाध्यक्ष उदकशांत करताना



श्री. पाध्ये गुरुजी आणि शिष्य वर्ग



उदकशांत

## चक्रसंगीत







चक्रसंगीताचा कार्यक्रम सादर करताना – सौ. नीलाक्षी पेंढारकर, सौ. कल्याणी पांडे–साळुंखे आणि पंडित सुरेश बापट

हे मासिक सौ. कल्पना साठे यांनी ब्राह्मण सेवा मंडळ यांचेसाठी नवलाई प्रिंट हाऊस प्रा. लि. पाईपलाईन, अंधेरी पूर्व येथे छापून ब्राह्मण सेवा मंडळ, भवानी शंकर रोड, दादर येथे प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संचालक व संपादक सहमत असतीलच असे नाही.